

# माणूस
साप्ताहिक

८ एप्रिल १९६७

चाळीस पैसे

विश्वस्तभावी उद्योगसंचालिका : श्रीमती सुमतीबेन मोरारजी



लोकमान्य आणि
राजमान्य ग्रंथाची
चतुर्थ आवृत्ती

# राजा शिव छत्रपती

ब. मो. पुरंदरे

- रॉयल आकाराची एक हजार पृष्ठे
- सुबक मुद्रण
- टिकाऊ बांधणी
- दलालांची आकर्षक चित्रे.
- ऐतिहासिक वास्तूंची दुर्मिळ छायाचित्रे.

**४० रुपये**

**प्रसिद्धीपूर्व ग्राहक योजना**
**पृष्ठ ३२–३३ पाहा.**




**एक समग्र साप्ताहिक**

*वर्ष : सहावे*
*अंक : चाळीसावा*
*किंमत : चाळीस पैसे*
*वार्षिक वर्गणी : वीस रुपये*

**संपादक**
श्री. ग. माजगावकर

**संपादक मंडळ**
*अ. मा. साधू*
*दिलीप माजगावकर*
*सौ. निर्मला पुरंदरे*

**व्यवस्था विभाग**
*अ. वा. गंधे*
*अ. वि. गणपत्ये*

*पत्ता – ४९१ नारायण, पुणे २.*
*दूरध्वनी – ५७३५१*

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे संपूर्णपणे काल्पनिक आहेत.

## पत्र-मैत्री

स. न. मार्च १६

दि. ४–३–६७ च्या 'माणूस' अंकात गोव्याविषयीचे खास वार्तापत्र वाचले. गेल्या जनताकौलाच्या वेळी संघराज्याचे बाजूने कॅथॉलिक चर्चने खूप पैसा ओतला, देवालयांतून प्रचार केला आणि गरीब हिंदूंना पीठ-धान्य वगैरे देऊन जिंकून घेतले असे आरोप करण्यात आले आहेत. याबाबत वस्तुस्थिती अशी आहे–

आज भारतातील कॅथॉलिक धर्मप्रांतामध्ये (Dioceses) गोवा हा धर्मप्रांत अत्यंत दरिद्री आहे. मुक्तीनंतर चर्चला मिळणारी मदतसुद्धा बंद झाली आहे. देवालयांतून कोणताही प्रचार झाला नाही. बिशप रिबेला यांनी तसे पत्रक अगोदरच काढले होते. गरीब (हिंदू किंवा ख्रिस्ती) लोकांना परदेशांतून आलेले धान्य वाटण्याचे काम भारतात– त्याचप्रमाणे गोव्यातही करतात. जनताकौलाअगोदर ते वाटप सर्वत्र चालू होते व अजूनही चालू आहे.

**बा. पा. लोखंडे, पुणे.**

Dear Sir, March, 11

I have been reading from time to time "MANOOS" and I have come to appreciate its open, fair and progressive attitude. The cover on your issue

of March 4th, took me by surprise. Please keep your open and progressive attitude which you must have forgotten when you selected the cover picture of March 4th. It does not help to bring communities and provinces closer together.

Let me just point out one wrong statement : The writer affirers that everybody knows that the church in Goa depends completely on Portugal. About 36 percent of the people in Goa are Catholics. The writer could have asked any one of them and they would have told him that this is wrong. Goa has now two Catholic Bishops, Goans, who have nothing to do with Portugal at all.

yours faithfully,
**Jack D'Souza,**
Ghodegaon.

**स. न.** २७ मार्च

बिहारमधील दुष्काळग्रस्तांसंबंधीची लेखमाला वाचून काय वाटलं हे सांगणं शब्दातीत आहे. वाचल्याबरोबर काही विचार मनात आले ते देत आहे--

'माणूस प्रतिष्ठान' ह्यासंबंधी काहीच करू शकणार नाही का ?

दंगेधोपे न करता महाराष्ट्रातील विद्यार्थिवर्गाने देशासमोर आदर्श निर्माण केला आहे. त्यात दुष्काळपीडितांसाठी मदत करून एक महान् आदर्श निर्माण करण्याचे आवाहन करावेसे वाटते.

नेहमीच्या उन्हाळी सुटचा पत्ते खेळण्यात, कन्या खाण्यात, नदीत डुंबण्यात जातात. तर ह्या वर्षीची सुटी काही मानवी जीवांना जगवण्यासाठी मदत करण्यात घालविली तर ?

शेवटी एकच. आतापर्यंत मी नुसता मार्ग सांगितला. मी स्वत: काय करू शकतो ? नोकरीधंद्यातील, संसारी माणूस असल्यामुळे त्या स्थळी काम करता येण्यासारखे नसले तरी इकडे राहून Organization आणि इतर कामे करू शकतो. कशामुळे कुणाला ठाऊक; पण दुष्काळ फंडांवर विश्वास बसत नाही. प्रत्यक्षात आपल्यातल्याच कुणीतरी काही चालू केलं तर मदत करण्याची इच्छा आहे. 'माणूस प्रतिष्ठान' ने हा विश्वास निर्माण केला आहे म्हणून आपणांस लिहिले.

**आ. शं. अभ्यंकर**

# अनुयायी हवेत

# आणि नेताही

दिल्ली दरबार

८ एप्रिल १९६७

निवडणुकीच्या निकालापासून काहीही बोध घ्यावयाचा नाही, असेच काँग्रेस-श्रेष्ठांनी ठरविलेले असावे. नाही तर गेल्या महिन्याभरात त्यांच्या दृष्टिकोनात बदल झाल्याचे दृश्य पाहावयास सापडले असते. आपल्याशिवाय या देशाला दुसरा कोणताच पक्ष स्थिर सरकार देऊ शकत नाही, हे काँग्रेस नेत्यांचे निवडणूक-प्रचारातील घोषवाक्य होते. सर्वसामान्य जनतेच्या अडीअडचणींबाबत आपण कितीही उद्दाम धोरण स्वीकारले तरी लोकमत आपल्याच पाठीशी उभे राहील, असा त्यांचा दावा होता; परंतु सहनशील मतदारांच्या सहनशीलतेलाही मर्यादा असते ही साधी गोष्टही सत्तेने धुंद झालेले काँग्रेस-नेते विसरले.

निवडणुकीचे निकाल वाचल्यानंतर कामराज असे म्हणाले होते की, ज्या राज्यांत काँग्रेस पक्षाला निर्विवाद बहुमत मिळाले नाही तेथे आमचा पक्ष मंत्रिमंडळ बनविण्याची घाई करणार नाही. परंतु लगेच राजस्थानमध्ये मंत्रिमंडळ बन-विण्याची त्यांना कोण घाई झाली होती! तेथील जनतेने रौद्र रूप धारण केले, तेव्हा सुखाडिया यांना मंत्रिमंडळ बनविण्याची आपली महत्त्वाकांक्षा सोडून द्यावी लागली. झाले एवढे हसे पुरे झाले नाही, या समजुतीने उत्तर प्रदेशात

श्री. चंद्रभानु गुप्ता यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेसने आपले मंत्रिमंडळ बनविले. परंतु तेथेही लवकरच काँग्रेसविरोधी वादळ होण्याचा संभव निर्माण झाला आहे.

## हरियानाची पुनरावृत्ती

या देशात जातीयवादाविरुद्ध सर्वांत कोणी जोराने प्रचार केला असेल तर तो काँग्रेस-पक्षाने आणि त्याबरोबरच जातीयवादाचा सर्वांत अधिक आसरा कोणी घेतला असेल तर तोही याच पक्षाने हा आरोप कोणा काँग्रेस विरोधकाचा नव्हे. चंद्रभानु गुप्ता यांच्या मंत्रिमंडळाबाबत बोलताना जुने काँग्रेस कार्यकर्ते श्री. चरणसिंग यांनीच तसें म्हटले आहे. ते नुकतेच असे म्हणाले की, यापूर्वीची मंत्रिमंडळे बनविताना बहुसंख्य जमातीच्या कार्यकर्त्यांना खूष राखण्याचे धोरण कटाक्षाने पाळले जाई. उत्तर प्रदेशात निर्विवाद बहुमत मिळाले नसतानाही जे मंत्रिमंडळ बनविण्यात आले आहे, त्यातही हेच धोरण दिसते. वस्तुतः आपले जुने धोरण पराभूत झाल्याचा प्रत्यय आला असताना काँग्रेस–श्रेष्ठ श्री. गुप्ता यांना कार्यक्षम मंत्रिमंडळ बनविण्याची सूचना देतील, असे मला वाटले होते. परंतु तसे काहीच घडलेले नाही. गुप्ता यांचे नवे मंत्रिमंडळ लोकांचा विश्वास संपादन करू शकेल, अशी शक्यता नाही.

परंतु चरणसिंगांच्या या टीकेकडे काँग्रेस–श्रेष्ठांचे लक्ष जाईल असे वाटत नाही. त्यांनाही त्याची कल्पना आहे त्यामुळे काँग्रेस पक्षातून बाहेर पडण्याचा ते विचार करीत असून ते आणि त्यांचे तीस सहकारी पक्षाबाहेर गेले तर गुप्ता मंत्रिमंडळास राजीनामा देणे भाग पडणार आहे ! म्हणजे उत्तर प्रदेशातही हरियाना पुनरावृत्तीची होण्याची वेळ येऊन ठेपली आहे.

गुप्ता यांनी यापूर्वीही मुख्यमंत्रिपद भूषविले होते. तेव्हाची त्यांची कारकीर्द बदनाम ठरली होती. बड्या उद्योगपतींना व जमीनदारांना हाताशी धरून सत्तास्थाने हस्तगत करण्याच्या कलेत गुप्ता वाकबगार आहेत. उत्तर प्रदेशातून कै. पंडित गोविंद वल्लभपंत दिल्लीला आल्यानंतर गुप्ता यांनी तेथे अक्षरशः धुमाकुळ घातला होता. मुख्यमंत्रिपद त्यांच्या हातातून निसटल्यानंतरही त्यांच्या कारवाया थांबलेल्या नव्हत्या. उत्तर प्रदेश काँग्रेसमधील अराजकाला खतपाणी घालण्यात गुप्ताजी नेहमीच पुढाकार घेत आले आहेत. अशा या गुप्तांना बिकट परिस्थितीतही मुख्य मंत्री करून काँग्रेस–श्रेष्ठांनी हेच सिद्ध केले आहे की पराभवामुळे काहीही शिकण्याची त्यांची इच्छा नाही.

चरणसिंगांच्या गटाला डावलून मंत्रिमंडळ बनविल्याबद्दल श्रेष्ठांनी गुप्ता यांना जाब विचारावयास हवा होता. कारण उत्तर प्रदेश काँग्रेसच्या राजकारणात चरणसिंग ही देखील एक प्रभावी शक्ती आहे. पक्षनेतेपदाची निवडणूक लढविण्याचा त्यांचा मानस होता; परंतु आधीच जर्जर झालेल्या पक्षाला गुप्ता विरुद्ध चरणसिंग हा लढा मानवणार नाही, असे काँग्रेस-नेत्यांनी सुचविल्यामुळे चरणसिंग यांनी माघार घेतली व गुप्ता यांची पक्षनेतेपदी अविरोध निवड होऊन पक्षांतर्गत ऐक्याचा

देखावा करण्यात आला. परंतु हे ऐक्य किती दिखाऊ होते हे गुप्ता यांनी चरणसिंग गटाला डावलल्यामुळे स्पष्ट झाले आहे.

हरियानामध्येही नेमके असेच घडले होते. भगवत दयाल शर्मा यांच्या नेतृत्वाला बारेंद्रसिंग प्रभृतींचा कडवा विरोध असतानाही शर्माजींचे नेतृत्व हरियाना विधान-सभा कॉंग्रेस पक्षावर लादण्यात आले. परंतु नेतेपदावर निवड होताच शर्मा यांनी बारेंद्रसिंग यांच्या गटाला मंत्रिमंडळ बनविताना पूर्ण बाजूला ठेवले. हरियानामध्ये जर कॉंग्रेसला निर्विवाद बहुमत मिळाले होते आणि तरीही तेथे बारेंद्रसिंगाच्या गटाने शर्मा यांच्याविरुद्ध उठाव करताच त्यांना मुख्यमंत्रिपद तर सोडावेच लागले; परंतु त्याबरोबरच हरियानामधील कॉंग्रेस राजवटही नामशेष झाली. परंतु कॉंग्रेस—नेत्यांच्या दृष्टीने एवढे पुरेसे झाले नसावे आणि म्हणूनच उत्तर प्रदेशातही तो खेळ खेळण्याची त्यांनी तयारी केलेली दिसते.

अर्थात् हे चित्र केवळ उत्तर प्रदेशापुरतेच मर्यादित आहे असे नव्हे. उत्तर भारतात कोठेही गेले तरी कॉंग्रेसवाल्यांची सत्तालोलुप वृत्ती प्रकर्षाने पाहावयास मिळते. सत्ता माणसाला भ्रष्ट करते आणि सर्वंकष सत्ता माणसाला संपूर्णतया भ्रष्ट करते अशा आशयाची एक इंग्रजी म्हण आहे. ही म्हण किती सार्थ आहे हे पाहावयाचे असेल तर कॉंग्रेस पक्षाच्या गेल्या वीस वर्षांतील वाटचालीकडे बोट दाखवावे लागेल. सत्ता, पैसा आणि जात यांच्या बळावर निवडणुका जिंकावयाच्या व त्यानंतर मन मानेल तसा कारभार करून वैयक्तिक महत्त्वाकांक्षा पुऱ्या करून घ्यावयाच्या हाच निरनिराळ्या राज्यांतील कॉंग्रेसी दादांचा मुख्य उद्योग. असे हाडीमाशी खिळलेली ही सवय दूर होणे कठिण आहे हेच भगवत दयाल शर्मांनंतर चंद्रभान गुप्ता यांनी दाखवून दिले आहे आणि म्हणूनच बारेंद्रसिंगाच्या पावलावर पाऊल ठेवण्याचे चरणसिंगांनी ठरविलेले दिसते. ओरिसा, बंगाल, मद्रास आदी राज्यांत कॉंग्रेसचे ' केरळ ' झालेले आहे. आणि तेथे 'हरियाना' होण्याची चिन्हे दिसत आहेत. उत्तर प्रदेश त्या वाटचालीतील पहिला मुक्काम असावा. कारण मध्य प्रदेश आणि आंध्र प्रदेश या दोन राज्यांतही कॉंग्रेस-अंतर्गत असंतोष धुमसत आहे.

मध्य प्रदेश जनसंघाचा पराभव करून कॉंग्रेसला घवघवीत यश मिळवून देण्यात रेवाच्या महाराजांचा फार मोठा वाटा होता. विंध्य प्रदेशावर महाराजांचे प्रभुत्व आहे. ते कॉंग्रेसच्या बाजूने उभे राहिले म्हणूनच विंध्य प्रदेशात इतर कोणत्याच पक्षाला यश मिळू शकले नाही; परंतु द्वारकाप्रसाद मिश्रा यांनी मंत्रिमंडळ बनविताना महाराजांना वगळल्यामुळे ते नाराज झाले असून पक्षत्याग करावा की काय याचा ते विचार करीत आहेत.

आंध्र प्रदेशातील परिस्थितीही यापेक्षा वेगळी नाही. तेथे ब्रह्मानंद रेड्डी व सुब्बा रेड्डी यांच्यांतील वितुष्ट जाहीरच आहे. द्वारका मिश्रांनी ज्याप्रमाणे रेवाच्या महाराजांना वगळले तसेच ब्रह्मानंद रेड्डी यांनी सुब्बा रेड्डी यांच्या गटालाही आपल्या

मंत्रिमंडळातून वगळले आहे. आंध्र प्रदेशात पूर्वी गोपाल रेड्डी व संजीव रेड्डी हा वाद बराच गाजला होता. त्यानंतर आता ब्रह्मानंद रेड्डी व सुब्बा रेड्डी हा वाद गाजत असून काँग्रेस–श्रेष्ठांनीसुद्धा ब्रह्मानंद रेड्डी यांचा पाठपुरावा करण्याचे धोरण अवलंबिले आहे. त्यामुळेच सुब्बा रेड्डी संतापले असून पक्षत्याग करण्याची भाषा आपल्या निकटवर्तियांजवळ ते बोलत आहेत.

निवडणूक-पूर्व कालखंडात कामराजांचा दरारा होता, परंतु या निवडणुकांत ते स्वतःच पराभूत झाल्यामुळे तो दरारा आता नाहीसा झाला आहे. काँग्रेस-संघटनेत नवचैतन्य निर्माण करण्यासाठी त्यांनी मोठ्या उमेदीने चार वर्षापूर्वी अध्यक्षपदाची सूत्रे स्वतःकडे घेतली. कामराज–योजनेमुळे त्यांचा दबदबा वाढला व काँग्रेसचे अध्यक्ष या पदाला त्यांनी प्रतिष्ठा निर्माण केली. नेहरूंच्या शेवटच्या कालात शास्त्रीजींच्या राजवटीत कामराजांनी आपले स्वतःचे स्थान निर्माण केले होते. त्यांच्या अध्यक्षपदाची मुदत येत्या नोव्हेंबरमध्ये संपत आहे. आपल्या कारकीर्दीच्या अखेरच्या कालखंडात मात्र काँग्रेसच्या पडझडीचे साक्षीदार होणे त्यांच्या नशिबी आले आहे. काँग्रेस–संघटनेला जर पुन्हा उभारी धरावयाची असेल तर तिला केवळ अनुयायांचाच शोध करावयाचा आहे असे नसून नव्या नेत्याचीही वाट पाहावयाची आहे.

**– सदाशिव पेकरठ**


## पंडित सातवळेकर सत्कार समिति

पं. सातवळेकर यांनी दि. १९ सप्टेंबर १९६६ या दिवशी शंभराव्या वर्षात पदार्पण केले आहे. त्यानिमित्त त्यांनी आयुष्यभर केलेल्या अखंड तपस्येचा गौरव करून, त्यांना गौरवनिधी अर्पण करण्याचा संकल्प समितीनें केला आहे.

या यंत्रयुगाच्या काळांत वेदांच्या रक्षणाची काही व्यवस्था न झाली तर हा अनमोल ठेवा विस्मृतीच्या गर्तेत जाऊन नष्टप्राय होण्याचा संभव आहे. याच तळमळीने पंडितजींनी वेदविद्येचे जतन करण्याचें महत्कार्य आरंभिले व वयाच्या शंभराव्या वर्षीही अत्यंत चिकाटीनें व परिश्रमपूर्वक ते तडीस नेण्याचा प्रयत्न पंडितजी करीत आहेत.

अशा सर्वमान्य कार्याला अल्पसा तरी हातभार लावण्यासाठी किमान एक्कावन्न हजार रुपयांचा गौरवनिधी त्यांना अर्पण करण्याचा समितीचा मानस आहे. त्याचप्रमाणे सत्कार समारंभानिमित्त पंडित सातवळेकर गौरव ग्रंथ प्रकाशित करण्याचे योजिले आहे.

तरी आपण हा संकल्प पुरा करण्यास जास्तीत जास्त हातभार लावाव ही नम्र विनंती.

सत्कार समिति, पुणे

# मुक्ताफळे



## □ कॉम्रेड एस. एस. भोसले

महाराष्ट्रात दोनशे वर्षांपूर्वी छत्रपती शिवाजी महाराज का उदय पावले याचे सतत संशोधन महाराष्ट्रात चालू असते. महाराजांची जन्मतिथीच आजपावेतो वांध्यात आहे. राजांविषयी महात्माजींनी तर सांगून टाकले होते :–

" अहिंसेच्या नावाची कसोटी म्हणून पाहिले तर त्या विजयी शूर वीरांच्या काळात व देशात मी जिवंत असतो तर त्यांतील प्रत्येकाला ' भ्रांत देशभक्त ' असे मी म्हटले असते असाच संभव फार आहे."

–गांधी विचार दर्शन. (९)

युगायुगात संभवणारी ही विभूती त्या काळांत जिवंत नव्हती हे आपले व त्यांचेही बाकी नशीबच ! म्हणजे कुणातरी एकाला आपल्याला मुकावेच लागले असते. महात्माजी अतिप्रामाणिक असल्याने ते असे म्हणाले व त्यांनी घोटाळा करून ठेवला. शिवाजीराजांचेच नाव घेऊन पुढे काँग्रेसला राज्य करावे लागेल तेव्हा त्यांची कोण पंचाईत होईल याची त्यांना बिचाऱ्यांना काय कल्पना ?

आता घोटाळा काय झालाय की धड शिवाजीचे राज्य नाही आणि धड महात्माजींचे नाही ! महात्माजींचे खरेखुरे राज्य झाले असते तर आपण पाकिस्तान व चीनला सांगून टाकले असते की " बाबांनो रक्तपात आम्हांला नको आहे. आमच्याजवळ मुळी सैन्यच नाही ! तुम्हांला काय करावयाचे ते करा ! ! " या प्रखर अहिंसेपुढे त्या चांडाळांना कदाचित खंत वाटली असती. परंतु ते झाले नाही. संरक्षण खर्च आपला वाढतो आहे. लोकांना अन्न नाही, राहावयाला घरे नाहीत, कापूस पिकत नाहीसा झाला आहे ! घरे नाहीत हे एका दृष्टीने बरे झाले. नाहीतर घरबांधणी हे खाते निर्माण झाले नसते व घरबांधणी मंत्री कमी झाला असता.

तात्पर्य, संरक्षणावरचा खर्च सतत वाढल्याने लोकांचे हाल सुरू झाले. आता व्यायाम केला म्हणून काही कुणी लगेच भिकेला लागत नाही; पण जनतेतले गुंड व व्यापारी या परिस्थितीचा फायदा घेऊन जनतेला लुटीत आहेत. (असा संशय आहे !) आम्ही म्हणतो नाही ना गांधींचे राज्य करायचे ? शिवाजीराजांचे करा. संरक्षणावर खर्च करा. शत्रूला पाणी पाजा. धूळ चारा. परंतु आमच्या चारा-पाण्याची व्यवस्था ज्यांच्यामुळे होत नाही, त्यांना फासावर वगैरे टांगता की नाही ! जाऊ द्या. आपल्याला च्यायला यातलं काही समजत नाही.... पण घोटाळा काय झालाय तो लक्षात आला आहे.

यंदा शिवजयंती धडाक्याने साजरी झाली. पुण्या-मुंबईत एखादी गोष्ट झाली की, ती धडाक्याने झाली असे म्हणायचे असते. मुंबईला महाराष्ट्राचे दुसरे यशवंतराव घरबांधणी मंत्री ना. मोहिते यांचे जोरकस भाषण झाले, महात्माजींनी शिवाजी-विषयी अतिप्रामाणिकपणे बोलून जो घोटाळा केला त्या परिस्थितीतून काँग्रेस मंत्रि-मंडळाला वाचविण्याचा हा सर्वांत धडाडीचा प्रयत्न आहे. याचे यथार्थ वर्णन करावे लागेल. शिवाजीराजे निर्माण झाले याचे कारण इतिहासकार काय सांगत होते:—

" मलिक काफूरने महाराष्ट्रात वणवे पेटवले. आकांत उडाला. तेराशे वर्षे राजांनी व प्रजाजनांनी खडतर तपश्चर्या करून निर्माण केलेले महाराष्ट्राचे वैभव नीचांनी पायाखाली तुडविले. आर्त किंकाळ्यांनी दिशा कोंडल्या. सैतानांनी संसार मोडले. घणांच्या घावाखाली सुंदर सुंदर मूर्तीच्या ठिकऱ्या उडू लागल्या. शंभर शंभर वर्षे खोदकाम करून निर्मिलेली स्वर्गीय शिल्पकला धडाधड कोसळू लागली. गोग्रास खाणाऱ्या गाई हंबरडे फोडून मरू लागल्या. गोकुळाचे स्मशान झाले. सैता-नांची सल्तनत सुरू झाली. तरुणींच्या, अर्भकांच्या अन् वृद्धांच्या टाहोंनी काळोखही गुदमरला.

अल्लाउद्दीनचा मात्र काफूरला हुकूम होता—

" सैनिकोंके अपराधों पर तथा अपहरण पर कोई ध्यान न देना ! "

त्या वेळी शिवाजीराजे झाले म्हणून फाळणीच्या वेळी आपण बचावून पाकि-स्तानात गेलो नाही असे फाळणीच्या वेळी या दुसऱ्या यशवंतरावांच्याही ध्यानात आले असले पाहिजे. आता फाळणी झाली. पुढची पाचपन्नास वर्षे तरी शिवाजी-राजांची आपल्याला गरज नाही. शिवाजीराजांचा आग्रह धरणे आम्हांला चम-त्कारिक वाटते. त्या काळात शिवाजीराजे झाले, आता नेहरुजी, इंदिराजी, यशवंत-रावजी होतील. परंतु शिवाजीजी नाही होणार ! यात खरे म्हणणे वाईट कशाला वाटायला हवे. परंतु शिवाजी राजांविषयी जनतेला भक्तिप्रेम आणि या जनतेला शिवाय मते यामुळे शिवाजीराजांना सुखाने इतिहासी पडून देणेही इष्ट नाही.

या अडचणीवर दुसऱ्या यशवंतरावांनी मात केली. त्यांनी शिवाजीराजांना कॉमरेड करून टाकले. ते ओजस्वी भाषणात म्हणाले—

" राजसत्तेच्या साहाय्याने स्वतः संपत्तिमान बनलेल्या आणि सरदारी, सरंजामदारी अधिकारांचा उपभोग घेणाऱ्या सर्व वर्गांच्या लोकांविरुद्ध लढून पिळल्या जाणाऱ्या गरीब लोकांना संरक्षणाची हमी द्यावी ही छत्रपतींची प्रेरणा होती व या दृष्टिकोनातून शिवचरित्राचा अभ्यास झाला पाहिजे.

" (म. टाइम्स दि. २९-३-६७)

आम जनतेला पिळणे, अर्थशोषण, वर्गलढा या कल्पना औद्योगिक क्रांतीशी निगडीत आहेत व ही क्रांती सतराव्या शतकात तरी झालेली नव्हती, हे जरी खरे असले तरी काय झाले ? एकदा शिवाजीराजांना कॉम्रेड भोसले करायचे ठरलेच तर या नव्या दृष्टिकोनातून पुनः इतिहास लिहिता येईल.

या दृष्टीने आपणाकडे याहून महान प्रकार झालेले आहेत. श्रीकृष्ण हा लोक शक्तीचा आद्यप्रवर्तक व कंस हा साम्राजशाहीचा हस्तक याविषयी आपल्याकडे विद्वानांनी लिहिले आहे. शिवाजीराजे त्या मानाने फार अलीकडचे ना ! मोहिते यांनी आपले ' नवगृहनिर्माण ' खात्याचे वजन खर्च करून शिवचरित्राचे म. म. दत्तो वामन पोतदार यांचेकडे सोपविलेले काम त्वरित काढून घ्यावे व कॉम्रेड एस. एस. भोसले यांचे एक महान चरित्र लिहिण्यासाठी जागतिक पातळीवर टेंडरे मागवावीत. आतापर्यंत शिवचरित्रावर होत असलेल्या अन्यायाला वाचा फोडून महाराष्ट्राच्या दुसऱ्या यशवंतरावांनी एका नव्या दुःखाला वाचा फोडली आहे.

●

—ग्यानबा

## केंद्रातील शेतकरी

केंद्रीय मंत्रिमंडळात जे ३३ मंत्री दाखल झाले आहेत, त्यांत असंख्य पी. एच्. डी. व अनेक डॉक्टर-बॅरिस्टर असले तरी शेतकऱ्याची दोन मुलेही आहेत. एक यशवंतरावजी व दुसरे अण्णासाहेब शिंदे. एकंदर संख्येत शेतकऱ्यांच्या मुलांचे प्रमाण कमी आहे ही दुःखाची गोष्ट असली तरी जे शेतकरी आहेत ते दोघे महाराष्टीय आहेत, याचा अभिमान महाराष्ट्राला वाटायला हवा. आपले सर्वच केंद्र मंत्रिमंडळ हे अमेरिकन शेतकऱ्यांना मुलासारखे असल्याने प्रत्यक्ष मंत्रिमंडळात शेतकरी कमी असले तरी अन्न प्रश्न सुटेल, अशी आशा आपण करू या.

• समीर

# विचार वारे

## □ इंग्लंडबद्दल प्रचलित गैरसमज

जॉन फ्रीमन हे नामांकित ब्रिटिश पत्रकार हिंदुस्थानात ब्रिटिश हायकमिशनर म्हणून आल्यापासून दिल्लीकरांना निरनिराळ्या विषयांवर त्यांची विचारपरिप्लुत भाषणे ऐकायला मिळाली आहेत. असेच एक भाषण त्यांनी परवा दिले. त्यात इंग्लंडबद्दल भारतात प्रचलित असलेल्या काही गैरसमजांची हजेरी घेतली.

त्यातला पहिला गैरसमज म्हणजे ब्रिटन हा ख्याली-खुशालीचा देश आहे. " ही कपोलकल्पना आम्हांला आवडत नाही, असे नाही. ती आधुनिक असून तिच्यामुळे आमच्याभोवती आकर्षकतेचे वलय निर्माण झाले आहे, आणि तिच्यामुळे टूरिस्ट मंडळींकडून आम्हांला बरेचसे परदेशी चलन मिळते." पण या कल्पनेत तथ्य फारच थोडे आहे. ही गोष्ट खरी आहे की, ब्रिटनमधली बरीच तरुण मुले लांब केस वाढवितात, चित्र-विचित्र कपडे घालतात, आणि सार्वजनिक जागी चित्र-विचित्र वाद्ये वाजवून-यात सतारदेखील येते-मोठ्या मंडळींचा रोष ओढवून घेतात. पण हे असे का होते याचे उत्तर 'खुशालचेंडू ब्रिटन'च्या कपोलकल्पनेपेक्षा अधिक गंभीर व वास्तववादी आहे.

हे उत्तर म्हणजे प्रचंड प्रमाणावर वाढलेले औद्योगिक उत्पादन, बेकारीचा संपूर्ण अभाव आणि पूर्वीपेक्षा चांगले पगार या गोष्टींमुळे सर्व वर्गातल्या तरुणांना फार मोठे स्वतंत्र्य मिळाले आहे. याहून अधिक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे आता स्वतःवर खर्च करायला त्यांच्या खिशांत दोन पैसे खुळखुळत असतात. अर्थात तो खर्च करताना ते आपल्या अभिरुचीला मोकळी सोडतात व ही अभिरुची काही वेळा निकृष्ट दर्जाची असते. रंगी-बेरंगी कपडे, चित्र-विचित्र केशरचना, 'पॉप' संगीत, वाद्यांचा गजबजाट व मोटार-सायकलींची धमाल या गोष्टी आधुनिक ब्रिटिश तरुणाच्या आर्थिक स्वातंत्र्यातून निर्माण झाल्या आहेत हे समजायला कठीण नाही.

पण या सर्व गोष्टी म्हणजे तरुणांनी दिलेला "धक्का" आहे असे म्हणायचे कारण नाही. शिवाय ज्या संस्कृतीचे संरक्षण करण्यासाठी तिला असल्या धक्क्यांपासून दूर ठेवावे लागते त्या संस्कृतीत फारसा दम नाही, असे म्हटले पाहिजे.

दुसरा प्रचलित गैरसमज म्हणजे उच्च नीच भावना व पैसा. या दोन गोष्टींमुळे संपूर्ण ब्रिटिश समाज दुभंगला आहे. हे निदान दुसऱ्या महायुद्धाच्या काळापासून

तरी सर्वस्वी खोटे आहे. सत्ता आणि उत्कर्ष साधण्याचे मार्ग आता सर्वांना खुले आहेत. याचा " उत्कृष्ट पुरावा " म्हणजे हॅरोल्ड विल्सन व एडवर्ड हीथ या दोन राजकीय नेत्यांचे पूर्वायुष्य. हे दोघेही समाजाच्या ज्या स्तरांतून वर आले त्याचे वर्णन पूर्वी ' खालचा मध्यमवर्ग ' असे करण्यात आले असते; पण आता त्यांची ही सामाजिक पार्श्वभूमी कोणाच्या लक्षातही येत नाही.


तिसरा गैरसमज म्हणजे ब्रिटन हा तंत्रज्ञानात मागासलेला देश आहे. दुसऱ्या महायुद्धाच्या काळापर्यंत हे काहीसे खरे होते, पण युद्धामध्ये ब्रिटनच्या अंगावरील मेद झडून गेला. युद्धोत्तर कठीण परिस्थितीमुळे आणि विशेषत: परकीय चलनाच्या तुटवड्यामुळे देशात दुसरी औद्योगिक क्रांती घडून आली व ती गेली तीस वर्षे जोरात चालू आहे. परिणामत: तंत्रज्ञानाच्या शर्यतीत ब्रिटन आता खूपच आघाडीवर आहे.

आणखी एक समज म्हणजे ब्रिटन साम्राज्यवादाचा व वसाहतवादाचा बालेकिल्ला आहे. हा समज खोटा असल्याचे सिद्ध करणे आता कठीण नाही; कारण पूर्वीच्या ब्रिटिश साम्राज्याच्या जागी आता सव्वीस स्वतंत्र व समान देशांचा राष्ट्रसंघ आहे व थोड्याशाच किरकोळ वसाहती शिल्लक आहेत.

## □ पत्रकारांचे ट्रेड युनियन

ब्रिटन वर्तमानपत्रांचा ' सम्राट ' रॉय टॉमसन यांचे वृत्तव्यवसायावरील विचार मागल्या वेळी सांगितले. उलट या सम्राटाच्या राज्यांतील एका ' कामगारा 'चे विचारही नुकतेच ऐकायला मिळाले. दिल्लीच्या प्रेस क्लबमध्ये ब्रिटिश वृत्तव्यवसायाच्या सद्य:स्थितीवर भाषण करताना नॅशनल युनियन ऑफ जर्नालिस्टस या ब्रिटिश पत्रकार संघटनेचे कार्यकर्ते जॉर्ज व्हायनर म्हणाले, तेथल्या वृत्तसृष्टीत नुकताच एक आणीबाणीचा प्रसंग येऊन गेला, त्यामुळे काही लोकप्रिय वर्तमानपत्रे बंद पडली तर काही भांडवलशहांनी विकत घेतली. मात्र एक लक्षात ठेवण्याजोगी गोष्ट म्हणजे वर्तमान पत्रचालकांनी खर्च वाचविण्यासाठी जे उपाय योजले त्यांच्यामुळे औद्योगिक अडथळा निर्माण होऊ दिला नाही. पत्रकारांनी व्यावसायिक संघटना करणे तितकेसे चांगले समजले जात नाही; परंतु पुरेसा प्रगल्भ दृष्टिकोन, सुव्यवस्थित संचालन व योग्य नेतृत्व या गोष्टी मिळाल्या तर पत्रकारांची संघटना समाजाच्या जीवनात महत्त्वाची भर टाकू शकते.

आकाशवाणीवर जाहिराती देण्याची कल्पना निघाली आहे तिच्याबद्दल ब्रिटिश वर्तमानपत्रांचा अनुभव लक्षात घेता मत काय? उत्तर : वर्तमानपत्रांचे जाहिरातीचे उत्पन्न कमी होण्याची काहीशी शक्यता आहे. ' न्यूज क्रॉनिकल ' आणि ' स्टार ' या वर्तमानपत्रांचा मृत्यू त्यांच्या जाहिराती टेलिव्हिजनने आपल्याकडे ओढून घेतल्यामुळे झाला यात संशय नाही. ●



# व्हो र्स्ट र...

दक्षिण आफ्रिकेवरील

दक्षिण आफ्रिकेचे पंतप्रधान श्री. हेन्ड्रिक व्हेरवॉर्ड यांचा खून झाल्या-नंतर त्यांच्या मंत्रिमंडळातले कायदेमंत्री श्री. बाल्थाझार व्होर्स्टर यांनी पंतप्रधानपदाची सूत्रं सांभाळली आहेत.

श्री. बाल्थाझार व्होर्स्टर यांच्या आजवरच्या कारकीर्दीचा आढावा घेणारा हा लेख....

दक्षिण आफ्रिकेच्या दिवसेंदिवस बिघडत चाललेल्या सामाजिक, राजकीय परिस्थितीची या लेखावरून जाणीव व्हावी....

काही महिन्यांपूर्वी दक्षिण आफ्रिकेचे पंतप्रधान श्री. हेन्ड्रिक व्हेरवॉर्ड यांचा खून करण्यात आल्याची घोषणा अचानकपणे करण्यात आली. त्या वेळची संपूर्ण देशभरातली तत्काळ प्रतिक्रिया होती— अविश्वास—

नंतर एक भयाण शांतता...आणि एकामागून एक गौरवर्णीय माणसे हुंदके देऊ लागली....काहीजण पोटतिडिकीनं मोठ्या आवाजांत चर्चा करू लागली....कृष्णवर्णीयांसाठी असलेल्या विभागांमधूनही अशीच भयाण शांतता होती. त्यात हुंदक्यांची भर नव्हती एवढंच.... एक कृष्णवर्णीय महिला हळूच उद्‌गारली, "नशीब, खुनी आपल्या-पैकी कुणी नव्हता."...एक गौरवर्णीय विद्यार्थी नाराजीनं म्हणाला... "यानंतर फक्त व्होर्स्टरनं सत्ता हाती घेऊ नये."...पण व्होर्स्टर-शिवाय दुसऱ्या कुणाच्याही हाती सत्ता जाणं शक्य नव्हतं हे साऱ्यांनाच

## लेखक : श्याम तारे

माहिती होतं....नुकत्याच झालेल्या व्हेरवॉर्ड यांच्या खुनानं दक्षिण आफ्रिकेतली परिस्थिती आणखी बिघडलेली आहे...सुधारण्याऐवजी...

सत्ता व्होर्स्टरच्याच हाती जाणार होती...ती गेली आहे...आणि त्याबरोबरच दक्षिण आफ्रिकेतील एकपक्षीय पद्धती आणि जातीयवाद शेवटच्या थराला जाऊन पोचला आहे...प्रत्येक नव्या राजवटीतली बंडाळी पूर्वीपेक्षा अधिकाधिक जोर धरते नि ती शमविण्या-साठी अभूतपूर्व अशी उपाययोजना केली जातेय्...प्रत्येक नवी

# भयानक काळी छाया

राजवट ही पूर्वीच्या राजवटीपेक्षा अधिकाधिक भयंकर जाचक होतेय्...नुसत्या राज्यकर्त्यांच्या नावावरूनही दक्षिण आफ्रिकेतल्या या जाचाची भयानकता मोजता येईल...मालान, स्ट्रायडम्, व्हेरवॉर्ड नि आता व्होर्स्टर...इतिहासावर मात करण्याच्या प्रयत्नांची नेमकी उलटी बाजू धरून चालणाऱ्या या देशाच्या भवितव्याचे हे मैलाचे दगड...आणि सध्या व्होर्स्टरच्या हाती सत्ता...

बाल्थाझार व्होर्स्टरचा इतिहास म्हणजे त्याच्या भूमिकेचा जाहीरनामा आहे आणि त्याच्या सध्याच्या हालचालींवरून दक्षिण आफ्रिकेच्या भवितव्याची निश्चित स्पष्ट कल्पना करता येईल इतक्या त्या बोलक्या आहेत.

दुसऱ्या महायुद्धाच्या काळात नाझींना पाठिंबा देण्याच्या आरोपाखाली याच व्होर्स्टरला दक्षिण आफ्रिकन सरकारनं त्याच्या राष्ट्रविध्वंसक हालचालींवरून १८ महिनेपर्यंत स्थानबद्ध करून ठेवलं होतं. आज पंतप्रधानपदी आरूढ झाल्यानंतरही त्यानं अधिकृतरीत्या आपल्या नाझींना पाठिंबा देणाऱ्या प्रवृत्तीचा इन्कार केलेला नाही....

## स्थानबद्धतेची बंधने !

हाच व्होर्स्टर २० वर्षांनंतर दक्षिण आफ्रिकेचा कायदेमंत्री म्हणून काम पाहू लागला. व्हेरवॉर्ड मंत्रिमंडळात कायदेमंत्री असतानाच ९० दिवसांच्या स्थानबद्धतेचा कायदा व्होर्स्टरनं पास करून घेतला. या कायद्यान्वये व्होर्स्टर म्हणेल त्या कोणत्याही व्यक्तीला कुठल्याही प्रकारच्या चौकशी किंवा न्यायालयीन चौकशीशिवाय ९० दिवसपर्यंत एकान्त कोठडीत डांबून ठेवण्याची मुभा होती. व्होर्स्टरच्या छद्मीपणाचा नमुना म्हणजे हा नव्वद दिवसांच्या स्थानबद्धतेचा कायदा त्याने 'परिस्थिती संपूर्ण ताब्यात' असल्याचा बहाणा करून रद्द करून घेतला नि थोड्याच दिवसांत नवा १८० दिवसांच्या स्थानबद्धतेचा कायदा पास करून घेतला. या नव्या कायद्यान्वये एकामागून एक अशी कितीही १८० दिवसांकरिता कुणालाही स्थानबद्ध करता येणे व्होर्स्टरला शक्य झाले होते. म्हणजे प्रत्यक्षात या कायद्यापुढे कुणालाही नेहमी-करिता डांबून ठेवण्याची मुभा व्होर्स्टरला मिळाली होती....

आपल्या कायदेमंत्रिपदाच्या काळात मृत्युदंडाच्या अधिकाराचा वापर करून व्होर्स्टरने एकंदर ५२० लोकांना मृत्युदंडाची शिक्षा ठोठावली. यांपैकी ५०० दुर्दैवी लोक कृष्णवर्णीय आहेत.

याच काळात व्होर्स्टरनं 'सुरक्षा पोलिस दलाची' स्थापना केली. अत्यंत निर्दयी म्हणून ख्याती पावलेल्या या निवडक अधिकाऱ्यांनी त्यांच्या असंख्य हेरांच्या मद-तीनं विरोधी पक्षांशी संबंधित असणाऱ्या प्रत्येक व्यक्तीची सांगोपांग माहिती एकत्र करून विरोधी पक्षांची पाळंमुळं खणून काढण्यात व्होर्स्टरच्या अपेक्षेपेक्षाही अधिक कार्यक्षमता दाखवून दिली. साध्या पोलिसदलाच्याही द्वेषाला पात्र झालेली ही सुरक्षा संघटना ही एक अत्यंत मोठी शक्ती बनून राहिलेली आहे. भरीला भर

म्हणून सत्तारूढ झाल्यानंतर ही सुरक्षा संघटना आपल्या स्वतःच्या अधिकारातच राहणार असल्याचं व्होर्स्टरनं जाहीर केलं आहे.

स्थानबद्धता कायद्याच्या मागोमाग व्होर्स्टरनं इतरही अनेक आदेश जारी करून विरोधी पक्षांची पाळंमुळं जवळजवळ संपूर्णपणे खणून काढली आहेत. दक्षिण आफ्रिकन विद्यार्थी संघटना हीसुद्धा त्याच्या रोषाला बळी पडली असून त्यांनाही व्होर्स्टरने धाक घालून ठेवला आहे.

'नुसास' (Nusas–National of South African Students) या संघटनेबद्दलचा तर व्होर्स्टर 'सापाच्या पिल्लांची खाण' किंवा 'समाजाचा कर्करोग' अशा शब्दांत द्वेष व्यक्त करतो.

व्होर्स्टरचं जाहीर भाषण ऐकलेला कुणीही त्याला विसरू शकणार नाही इतकं ते जहरी असतं–बोचरं असतं...पसरट चेहऱ्याचा नि जाडजूड असा हा गृहस्थ... अत्यंत जाड भुवया आणि डोळ्यांखालची विचित्र काळी छाया यामुळे अधिकच भयानक वाटतो.

त्याचे डोळे थंड नि भावरहित असतात. जाहीर सभेच्या व्यासपीठावर त्याला भाषण करण्याची सूचना केली जाईपर्यंत व्होर्स्टर आपल्या खुर्चीत शांतपणे बसलेला असतो. त्याची नजर मात्र सारखी श्रोत्यांचा भेद घेत असते. आणि एकदाचा बोलायला उभा राहिला की आपल्या संपूर्ण सामर्थ्यानिशी अन् काहीशा कर्कश-कठोर आवाजांत व्होर्स्टर श्रोत्यांवर अंगार उधळू लागतो. भाषणातच मधूनमधून त्याची गर्वोक्ती चाललेली असते. (आफ्रिकन राज्ये ना !...ती तर मी चटणीसारखी उडवून टाकीन !'...) बोलता बोलता मध्येच व्होर्स्टरच्या हनुवटीला घडी पडल्यासारखी वाटते नि व्होर्स्टर कधीही हसत नाही.

अशा या गृहस्थाला दक्षिण आफ्रिकन सत्तारूढ राष्ट्रीय पक्षाच्या संसद समितीनं नेतेपदाची वस्त्रं बहाल केली आहेत. त्यांच्या मताप्रमाणं दुसऱ्या कुणाचीही नेतेपदी निवड होणं केवळ अशक्य होतं. कारण व्हेरवॉर्डनं आखून दिलेल्या मार्गावर अचूक आगेकूच करण्याचं काम फक्त व्होर्स्टरच करू शकला असता...

## व्हेरवॉर्ड नि व्होर्स्टर

व्होर्स्टरची राजवट ही व्हेरवॉर्डच्या राजवटीपेक्षा काही बाबतींत वेगळी असू शकेल. व्हेरवॉर्ड हा राजकारणी नि मुत्सद्दी होता तर व्होर्स्टर हा पक्का व्यवहारी नि धूर्त राजकारणी आहे. वेगळ्या आफ्रिकन राष्ट्रांची निर्मिती ही ईश्वरी इच्छा आहे, अशी कल्पना उराशी बाळगणारा व्हेरवॉर्ड एक प्रामाणिक कार्यकर्ता होता. पंतप्रधानपदाची सूत्रं हाती घेतल्यानंतर लोकमत अनुकूल व्हावं म्हणून व्हेरवॉर्डनं सुरुवातीला काही दिवस रोजच्या किरकोळ राजकीय घडामोडींकडे जाणून बुजून दुर्लक्ष केलं होतं. हे लक्ष देण्याचं घाणेरडं काम त्यानं व्होर्स्टरसारख्या आपल्या

सहकाऱ्यांवर सोपवलं होतं. आपली अंतर्गत घडामोडींकडे दुर्लक्ष करण्याची ही वृत्ती परराष्ट्रांना आणि स्वतःच्या लोकांनाही पटत नाही, असं लक्षात आलं तेव्हा व्हेरवॉर्डनं 'वेगवेगळा विकास' या नावाखाली गौरवर्णीय व कृष्णवर्णीयांचा विकास करण्याच्या एका नव्या तंत्राचा मुहूर्त केला. खरोखरच आपला विकास होईल अशा भावनेतून साऱ्यांनीच हे धोरण स्वीकारलं. तसं हेच अधिकृत सरकारी धोरण म्हणून व्हेरवॉर्डच्या कारकीर्दीत अंमलात आलं.

परंतु प्रत्यक्षात वेगवेगळ्या विकासाचं हे धोरण व्हेरवॉर्डच्या अगोदरच्या धोरणा-पेक्षा मुळीसुद्धा वेगळं नव्हतं. विचार मात्र दोन्हींमध्ये वेगळे होते; कारण 'वेग-वेगळ्या विकासात'ही पूर्वीच्या धोरणानुसार कृष्णवर्णीय समाजावर गोऱ्यांचं वर्चस्व राहणार होतं आणि त्याचा उपयोग गोरे लोक स्वतःच्या स्वार्थासाठी अजूनही करून घेऊ शकत होते.

व्हेरवॉर्डच्या व्याख्येप्रमाणे दक्षिण आफ्रिकेत प्रत्येकाला सारखाच अधिकार राह-णार होता; फक्त प्रत्येक जमातीला आपापल्या विभागातच या अधिकारांचा उपयोग करता येणार होता, हीच यातली 'ग्यानबाची' होती.

व्हेरवॉर्डला दक्षिण आफ्रिकेत गौरवर्णीय आणि कृष्णवर्णीय यांचे संपूर्ण वेगळे विभाग हवे होते. त्याची 'वेगवेगळ्या विकासा'ची योजना हे कार्य पार पाडू शकेल, अशी त्याची खात्री होती. पण प्रत्यक्षात मात्र हे कधीही शक्य नव्हतं आणि याचं एकमेव कारण म्हणजे दक्षिण आफ्रिकेतील कृष्णवर्णीयांची अवाढव्य संख्या. आणि म्हणून टक्केवारी...

मग एकंदर लोकसंख्येच्या ८० टक्के असणाऱ्या या कृष्णवर्णीयांना एकंदर भूभा-गाचा फक्त १३ टक्के भूभाग देण्यात आला. या १३ टक्क्यांमधून मोठाली शहरं, खाणींचे विभाग, बंदरं आणि औद्योगिक विभाग काळजीपूर्वक वगळण्यात आले; त्यामुळे या भूभागात प्रत्यक्षात अत्यंत कमी लोकसंख्या सामावू शकते. उद्योग-धंद्यांचा या विभागातला संपूर्ण अभाव हेच याचं मुख्य कारण आहे. कृष्णवर्णीयांच्या एकंदर संख्येच्या दोन तृतीयांश लोक हे नेहमीकरता या तथाकथित 'समान अधि-कार गाजविण्यासाठी' सुपूर्द केलेल्या भागाच्या बाहेर राहत आहेत.

## एक दुष्ट नि भकास योजना

कायद्यांच्या स्वरूपातही कृष्णवर्णीयांच्या वाट्याला विशेष काहीच आलेलं नाही. १३ टक्के भूभागाच्या एका लहानशा विभागाला—'ट्रान्स्काई'ला—स्वातंत्र्य देण्यात आलेलं असून एक छोटंसं मंत्रिमंडळही अस्तित्वात आहे. परंतु या प्रांताच्या मुख्य-मंत्र्याला तो कृष्णवर्णीय असल्यामुळे त्याच्याच प्रांतात गोऱ्यांसाठी राखून ठेवलेल्या विभागांमध्ये प्रवेश-निषेध आहे. तसा प्रवेश केला तर त्यालाही अटक नि स्थान-बद्धतेची शिक्षा ठेवलेली आहे!

'वेगवेगळ्या विकासा 'चं तंत्र प्रत्यक्षात कधीच येऊ शकत नाही; तसंच दक्षिण आफ्रिकेचं वर्णवार विभाजनसुद्धा अशक्यच आहे. वर्णवारीनं विचार केला तर दक्षिण आफ्रिकेतील जास्तीत जास्त गौरवर्णीय लोकांच्या विभागातही कृष्णवर्णीयांची संख्या गौरवर्णीयांपेक्षा अधिक आहे. आणि दोहोंमधला हा फरक दिवसेंदिवस वाढतोच आहे. दक्षिण आफ्रिकेचा गौरवर्णीय भाग हा संपूर्णपणे कृष्णवर्णीय कामगारांवर अवलंबून आहे; त्यामुळे कृष्णवर्णीयांच्या सहकार्याशिवाय दक्षिण आफ्रिकन सभ्यता एक क्षणभरही टिकेल की नाही अशी रास्त शंका उपस्थित झाली आहे.

अशा परिस्थितीत सत्ता कायम ठेवण्यासाठी फक्त बलप्रयोग आणि धाकदपटशा यांचाच प्रयोग करणे शक्य आहे आणि त्या दृष्टीने बाल्थाझार व्होर्स्टर हा अत्यंत लायक माणूस आहे, असं म्हणता येईल.

## 'वेगवेगळ्या विकासा 'चे परिणाम

इतकं असूनही व्होर्स्टरनं आजवर 'वेगवेगळ्या विकासा 'च्या तंत्रावर त्याचा विश्वास असल्याचा एकदाही दावा केलेला नाही, ही लक्षात घेण्यासारखी गोष्ट आहे. व्हेरवॉर्ड मंत्रिमंडळात असतानाही या तंत्राशी विशेष संबंध येऊन देण्याची त्यानं काळजी घेतली होती. आता पंतप्रधान या नात्यानं या तंत्राशी इतका दुरावा ठेवणं त्याला शक्य होणार नाही हे खरं असलं तरीही या तंत्राकडे जास्तीत जास्त दुर्लक्ष करण्याचे काम तो चोख बजावल्याशिवाय राहणार नाही. त्याचे परिणाम असे होत आहेत...

१. दक्षिण आफ्रिकन सरकार प्रत्येक गोऱ्या विद्यार्थ्यामागे मोफत आणि आवश्यक केलेल्या शिक्षणांसाठी ६३ पौंड इतकी रक्कम खर्च करते; कृष्णवर्णीयांच्या बाबतीत हीच रक्कम ६ पौंड इतकी असून त्यांच्याकरता शिक्षण मोफत तर नाहीच नाही; परंतु आवश्यकही करण्यात आलेलं नाही.

२. सर्व उच्चपदस्थ नोकरीच्या जागा ह्या गौरवर्णीयांसाठी राखून ठेवण्यात आल्या असून कृष्णवर्णीय कामगारांचे पगार त्याच दर्जाच्या गौरवर्णीय कामगारांच्या पगाराच्या १० ते ४० टक्के इतके आहेत.

३. प्रत्येक ठिकाणी गौरवर्णीय आणि कृष्णवर्णीय यांच्यासाठी वेगवेगळी व्यवस्था केली आहे. पोस्ट ऑफिस, रेल्वेगाड्या इत्यादींमध्ये वेगवेगळी दालने नि प्रवेशद्वारे ठेवण्यात आलेली असून या दोहोंमध्ये असलेल्या सोयींमध्ये जमीन अस्मानाचा फरक आहे ही गोष्ट निराळीच...

बाल्थाझार व्होर्स्टरच्या तरबेज हातांमध्ये दक्षिण आफ्रिकेची ही घोडदौड चालू आहे...ज्या दिवशी यात बदल होईल तो सुदिन—

●

# "मी जिंकले, मी हरले"

मी पण आता निश्चयच केला, एक दिवसाचं हे नाटक उत्तम वठवायचं—आपल्याला काही कायमचं आदर्श गृहिणी बनणं जमणार नाही. आणि सासूबाईंना पण दाखवून द्यायचं, की हम भी कुछ कम नहीं—

सौ. मंदाकिनी चिपळूणकर

त्या दिवशीची सकाळ नेहमीप्रमाणेच उजाडली—म्हणजे अगदी नेहमीप्रमाणेच गोंधळाची! मला फक्त तीनच मुलं आहेत, पण रोज सकाळी मला ती तीन डझनासारखी वाटतात—माली—माझी मैत्रीण—म्हणे त्याप्रमाणे मला रोज सकाळी वाटे की ही सगळीच्या सगळी तिन्ही डझन मुलं पोत्यात घालून ठेवावी थोड्या वेळापुरती—पण हे आपलं गमतीचं बोलणं हो! हं, तर काय सांगत होते की, ही सकाळ नेहमीप्रमाणेच उजाडली—मी उठले, मुकुंदाची ब्रेकफास्टची तयारी केली. एका बाजूला मिनीला कडेवर घेऊन ऑम्लेट टाकलं, दुसरीकडे तिचं दूध तयार केलं—ती आपली रडतच होती—मुकुंदा ओरडत होता, "अग, तिच्याकडे बघ तरी जरा." मी त्याच्याकडे स्मिताचा एक तुकडा फेकीत मिनीला या कडेवरची त्या कडेवर करीत म्हटलं, "हं, ती आता गप्प बसेल—पण तू तुझे ते महत्त्वाचे कागद बॅगेमध्ये घालायला विसरला नाहीस ना?" तो एकदम थक्क झाला—तो म्हणाला, "छली, मला राहून राहून आश्चर्य वाटतं की, माझ्या प्रत्येक कामाची तुला बरोबर आठवण राहते अन् तुझी स्वतःची कित्येक कामं तू विसरतेस! हे कसं ग?" मी काहीच बोलले नाही उघड, पण मनात म्हटलं, 'बरोबरच आहे! माझं तुझ्यावर प्रेम आहे. मला तुझ्या कामात Interest आहे. तू खूप खूप वर चढावंस. तिशीच्या मानानं तू खूपच यश मिळविलं आहेस पण—पण—काही वेळेला तू जास्त चिडतोस



ना माझ्या हलगर्जीपणाबद्दल, आळशीपणाबद्दल. हो ना ?' –हे अन् असले विचार मनातून बाहेर ढकलावेच लागले. कारण तेवढ्यात अनू अन् बच्चू वाऱ्याच्या वेगानं स्वयंपाकघरात घुसले. मुकुंदाने बॅग उचलली आणि पळायचा प्रयत्न केला–पण बच्चूनं त्याला धरलंच–झालं–पॅंटवर ओले थप्पे उठले हाताचे. बच्चूला मी खसकन् ओढले. मुकुंदा जाताजाता म्हणाला, " हे बघ छली, आज दुपारी मुलांना इंजेक्शनं द्यायला घेऊन जायचं आहे–धोब्याचे कपडे आणायचे आहेत–आणि कसली बिलं आलीच तर ती माझ्या ड्रॉवरमध्ये टाक–माझ्या बरं का !" रागाचा कटाक्ष फेकीत तो गेला. मागच्या महिन्याचं बिल मी आठवणीनं माझ्या पर्समध्ये ठेवलं होतं पण बच्चूनं ते केव्हा फाडलं कुणास ठाऊक ! पण एखाद दिवशी मेणबत्तीच्या उजेडातलं जेवण वाईट लागतं का, सांगा बरं !–दाराशी गेल्यावर परत मुकुंदा मला म्हणाला, " आज तू तुझ्या पिशव्या तर नाहीना वनवीत बसणार ?" कचऱ्याच्या डब्यात हात घालणाऱ्या अनूला ओढत मी निष्पाप नजरेनं विचारलं, " नाही, पण सौभाग्य वस्तुभांडाराला कबूल केलेल्या डझन पिशव्या आज पुऱ्या करू नको म्हणतोस ?" मुकुंदानं मला मोठा सुस्कारा टाकून दाराबाहेर पाऊल टाकलं–म्हणजे परत संध्याकाळी पिठलं भात–असाच त्याच्या सुस्काऱ्याचा अर्थ !

मी मुलांची जेवणीखाणी उरकली–मुकुंदाचा डबा पाठवला. इकडे तिकडे जरा

घरावर हात फिरवला. मग स्वच्छ साफसूफ करीन हं, असं घराला आश्वासन दिलं आणि पिशव्या बनवायला बसले. खरं म्हणजे हे घरकाम, हा स्वयंपाक, मला मुळीच आवडत नसे. आर्टस्कूलमध्ये माझं थोडंसं शिक्षण झालं होतं. शिवण, पेंटिंग, Handi Craft असले छोटे छोटे कोर्स मी पुरे केले होते. नेहमी काहीतरी बनवावं असं मला वाटे आणि हे तुटपुंजं ज्ञान मला उपयोगी पण पडे. मुकुंदानं जेव्हा नवा व्यवसाय सुरू केला, जेव्हा पैशाची चणचण बरीच भासू लागली, तेव्हा मी घर-बसल्या प्लॅस्टिकची फुलं, पिशव्या, टेबलक्लॉथ इत्यादींच्या खादीच्या दुकानच्या ऑर्डर्स घेऊन बराच पैसा मिळविला. म्हणजे घराचं भाडं थकलंय किंवा रेशनला पैसेच नाहीत असा प्रकार तरी घडला नाही.

आजही मी माझा आवडता व्यवसाय मजेनं करीत बसले होते एवढ्यात पोस्ट-मन आला–मी धावले–प्रथम मला वाटलं मुकुंदाच्या कामाचं, पण वर माझं नाव म्हणून उघडलं आणि वाचते तो काय? माझे डोळे अन् तोंड एकदमच शक्य तेवढे जास्तीत जास्त विस्फारले. मला सगळं आठवलं. तो दिवस, ते आमचं भांडण–वाङमय विकास महिला मंडळाकडून आलेलं ते पत्र होतं. त्या दिवशी आम्ही रेडिओ ऐकत बसलो होतो. तेव्हा त्या दिवशींची वाङमय विकास मंडळाची ती स्पर्धा वनिता मंडळाच्या कार्यक्रमाच्या वेळी मुकुंदानं ऐकली होती. शहरातली सर्वांत 'आदर्श गृहिणी व माता' अशा स्त्रीच्या पतीनं आपली पत्नी आपल्याला आदर्श का वाटते हे कळवायचं–त्या दिवशी माझं न् मुकुंदाचं खूप वाजलं होतं. बच्चूनं मुकुंदाच्या अंगावर सगळं दूध सांडलं होतं, तर अनूनं सगळी बाथरूम लाल खडूनं रंगवून ठेवली होती. सगळंच बिनसलं होतं अशा वेळी रेडिओवरची ती स्पर्धा ऐकली. मुकुंदा रागानं मला खिजवत म्हणाला होता, "थांब, तुझं नाव मी त्या स्पर्धेला धाडून देतो–तू सगळ्यात आदर्श गृहिणी आहेस. हाऽहाऽ!!" तो खरंच तसं काही करील असं मला मुळीच वाटलं नव्हतं हे पत्र येईपर्यंत! शहरातल्या दहा आदर्श स्त्रियांत माझी निवड झाली होती. आणि पुढल्याच आठवड्यात मंड-ळाच्या तीन स्त्रिया माझ्या घरी येऊन धडकणार होत्या. वाङमय विकास मंडळाच्या या परिक्षिकांना मी माझे घर, माझी एखादी कलाकृती, माझं पाककौशल्य दाखवा-वयाचं होतं. म्हणजे माझी सत्त्वपरीक्षाच होती म्हणाना! मी कपाळाला हात लावून धाडकन कोचावर बसले. मुकुंदानं खवचटपणानं काहीतरी लिहिलं असावं आणि वाङमय विकास मंडळाच्या त्या बायांना ते खरंच वाटलं असावं मुकुंदाचं ते लिहिणं! जणू काही राजवाडाच वाटावा असं वर्णन तो एकाद्या झोपडीचंसुद्धा करू शकेल. पत्र हातात धरून मी सुन्न बसले. खूपखूप रडावंसं वाटलं. मूर्ख वेडी न ठरता या दिव्यातून मी कशी पार पडू! काही सुचेना! रेडिओवरून पण थोड्या वेळानं वनिता वाङमय विकास मंडळात तीच बातमी सांगितली. आम्हां दहा जणींची नावं, वाचून दाखवली. मंडळाने जाहीर केलेली स्पर्धा, निवड, बक्षिसं

सर्व त्याच वेळी सांगितलं–

डोळ्यांत अंगार आणि हातांत पत्र घेऊनच मी संध्याकाळी मुकुंदाचं स्वागत केलं ते बघून तो माझ्यापेक्षाही जास्त चाट पडला. " छली, तुला दुखवायचा माझा मुळीच उद्देश नव्हता, पण त्या दिवशी मी तुझ्यावर इतका रागवलो होतो, तस्साच मी पत्र लिहायला बसलो–लिहायला लागलो अन् मला गंमतच वाटायला लागली–मी लिहिलं, " छलीसारखी गृहव्यवस्था कुणीही ठेवीत नसेल ! तुझ्या कल्पनाशक्तीनं तू रोज मला कसे आश्चर्याचे धक्के देतेस, रोज नवनव्या चवदार (!) पदार्थांनी तू माझ्या जिभेला कसे चटके देतेस ! इ. इ. .... पण आता मला स्वतःलाच जाऊन तिथं सांगायला पाहिजे की मी गंमत केली म्हणून. " मग मात्र आणखीनच् संताप आला मला. " ते काही नाही, मला निवडलं आहे ना, मग मी आता भाग घेणारच. एक दिवस मी नक्कीच घर साफसूफ, स्वच्छ करीन, अनूला वाढदिवसाला शिवलेला फ्रॉक मस्त झाला आहे असं सासूबाईच म्हणाल्या. तो धुऊन इस्त्री करून ठेवीन–झालंच तर–" मी बोलण्याच्या ऐन भरात असतानाच मुकुंदानं मला जवळ ओढून आश्वासन दिलं, " हे बघ छली, तू स्पर्धा जिंक नाहीतर नको जिंकूस, तू माझी नेहमीच आदर्श गृहिणी आहेस." मी पण आता निश्चयच केला होता. एका दिवसाचं हे नाटक उत्तम वठवायचंच–सासूबाईंना पण दाखवायचं की 'हम भी कुछ कम नहीं' ... मी लीलावन्संसारखं घर का स्वच्छ ठेवीत नाही याचं त्यांना नवल वाटतं ! ठीक आहे–आज मला संधी मिळाली आहे अन् मी त्याचा पुरेपूर फायदा घेणारच. थोड्या वेळाने झंझावातासारख्या सासूबाई घरात घुसल्या–नवलाईनं भारल्यासारख्या ! काय आल्याआल्याच मला म्हणतात, 'काय ग तूच का ती, वत्सला अत्रे, आदर्श गृहिणी ?' त्या आपले डोळे माझ्या अस्ताव्यस्त घरावरून फिरवतात. मी नम्रतेनं 'हो' असं पुटपुटले. " मुकुंदानं ते पत्र पाठवलं. "

" मुकुंदाला वाटलं आपली छली काय वाटेल ते करील–ठीक आहे. आता असं करूया. स्वयंपाकात मी तुला मदत करीन. झक्क पुरणपोळ्या बनवू या. लीला न् मी फर्निचर पॉलिश करू. हिराकडून घर साफसफाई करून घे. खिडक्यादारांना मी कालच शिवलेले पडदे लावून टाकू ". सटासट भात्यातून बाण सुटावेत तशा त्या बोलत होत्या. " पण सासूबाई, हे काही बरं नव्हे. " मी हळूच म्हटलं. त्यांनी क्षणभर माझ्याकडे पाहिलं. मायेनं त्या म्हणाल्या, " बरोबर आहे वत्सला तुझं म्हणणं ! सगळं तुलाच करणं भाग आहे. मुकुंदाला तू इतकी प्रिय आहेस हेच मुख्य आहे. खरंच अभिमानाची गोष्ट आहे तुला ! त्या परीक्षक काही ठरवोत, तुझा नवरा तर तुझ्यावर खूष आहे ना ? " माझ्या डोळ्याचे डोह पाण्यानं काठोकाठ भरले. डोहांतलं पाणी बोटानं निपटीत मी म्हटलं, " सासूबाई, तुम्ही असं म्हटलंत यांत सगळं आलं–"

दोन-तीन दिवसांनी परत माझ्या नावचं कार्ड आलं Interview चं. जन्मात कधी मी Interview दिला नव्हता ! मी मुलांना छान छान कपडे घातले. जरा केसांवरून हात फिरवून झुळझुळीत साडी नेसले. मुलांना घेऊनच मी गेले. टिपटॉप ऑफिस बघून मुलं बिचारी चुपचाप झाली. मग कॉफी आली. काय झालं कुणास ठाऊक, पण मी आपली परीक्षकांना आमची मुलं, मुकुंदाचं ऑफिस, माझी Hobby याच गोष्टी सांगू लागले अन् त्याही त्या मन लावून ऐकायला लागल्या. अखेरीस "मग मंगळवारी आम्ही चहाला येऊ की जेवायला ?" या त्यांच्या प्रश्नानं मी एकदम माझं बोलणं आवरतं घेतलं. झटपट डोकं चालवून त्यांना जेवायचंच आमंत्रण दिलं. हो, जेवण जरा उशिरा करीन, मुलंही दुपारची झोपतील. हो, आणि सबंध दिवस घर स्वच्छ राखायचं कसं हा एक मोठाच Problem होता ना !—

त्या रात्री लीलावन्सं, सासूबाई, मी अन् मुकुंदा यांची Meeting भरली. "मी तुझ्या मुलांना सांभाळीन, म्हणजे तुला घरबीर साफ करता येईल," लीलावन्सं म्हणाल्या तर सासूबाईंनी पुरणपोळी कशी करावी याचं साग्रसंगीत वर्णन केलेला कागद माझ्यापुढे केला. मुकुंदानं बाहेरची बाजू सांभाळीन, असं तोंडभरून आश्वासन दिलंन. त्या दोघींच्या मदतीने मी जेवणाचा Menu आखला. पुरणपोळी पाठ केली. रविवारी मी न् मुकुंदानं घराची बाहेरची बाजू साफ केली. आतील साफसूफ उद्यावर टाकून आम्ही अंथरुणावर पडलो. सोमवारी उजाडताच लीलावन्सं धापा टाकीत आल्या. "वत्सला, अग, माझ्या दोन्ही मुलांना गोवर आला बाई आणि ह्यांनासुद्धा ! अग हसतीस काय अशी ? आता तुझ्या मुलांना मी कसं काय सांभाळू ग ! शी: काय तरी बाई त्रास !" मी कसंबसं त्यांना शांत करीत म्हटलं, " अहो वन्सं, ठीक होईल सगळं ! मी येऊ का तुमच्या मदतीला ?"

" अय्या, वेडी की काय तू ! मीच खरं म्हणजे तुझ्या मदतीला यायचं ! एवढा महत्त्वाचा तुझा दिवस उद्याचा. पण आता काय करशील ग तू ?" त्या अगदी रड-कुंडीला येत म्हणाल्या. मुकुंदा पण असाच घाबरून लगालगा झाडू घेऊन घर झाड-ण्याच्या मोहिमेला लागला. पण मी शांतपणे त्याचा झाडू काढून घेऊन त्याला गप्प केलं. फरशा, फर्निचर इत्यादी आज पुसून उपयोग नव्हता. कारण उद्यापर्यंत त्या साफ राहणार होत्या थोड्याच मुलांच्या तडाख्यात ! दुपारी सासूबाईंचा निरोप आला, " लिलीची मुलं आजारी आहेत, तर मी तुझ्या मुलांना न्यायला येते. पण हा महिन्यातला पहिलाच मंगळवार..." बरोबर. त्यांच्या मंडळाच्या निवडणुकीचा दिवस ! अध्यक्ष होण्याकरता त्या बरेच दिवस खटपट करीत होत्या नाही का ? मी खोट्याच उत्साहानं त्यांना म्हटलं, " छे छे, आम्ही दोघांनी कालच घर साफसूफ केलं आहे. काळजी मुळीच करू नका. तुम्ही निःशंक मनानं मंडळात जाऊन या हं !" मी मोठा सुस्कारा टाकला. घरावरून हताश नजर फिरवली. काहीही स्वच्छ नव्हतं, साफ नव्हतं. तो फ्रॉक तरी स्वच्छ करावा, इस्त्री करून ठेवावा म्हणून बाहेर

काढला. इस्त्री चालू केली तेवढ्यात मुलांच्या खोलीतून 'धप्प' असा आवाज आला तशी मी न् मुकुंदा धावलो. मिनी जमिनीवर पडली होती. चेहरा चमत्कारिक निळा पडला होता अन् श्वास कोंडला होता. आम्ही दोघांनी तिला उचललं, थोपटलं, आपटलं तशी ती रडू लागली आणि आमच्या जिवात जीव आला. मला तर बाई रडूच यायला लागलं. मुकुंदानं माझी समजूत घातली. मिनीला परत झोपवलं आणि आम्ही आत आलो. अरे देवा ! फ्रॉकवर तापलेली इस्त्री ठेवून मी तशीच धावले होते– इतका सुंदर फ्रॉक आता ठिकठिकाणी जळला होता. तरी बरं, खालपर्यंत धग पोचली नव्हती ! आता मात्र मी चांगलेच हुंदके देऊ लागले. मुकुंदा म्हणाला, " कसली स्पर्धा न् कसलं काय ! सगळ्या घरातली शांती घालवून टाकली त्या स्पर्धेनं. त्याच्या ताणामुळं तुझं मन ठिकाणावर नाही छली ! हं, चल आता झोप बघू शांत-पणे." त्यानं बळजबरीनं मला झोपवलं अन् मला थोपटीत तो शेजारीच बसला. तेव्हा सांगायचं काय की दुसरे दिवशी परीक्षक मंडळ आलं तेव्हा मी, माझं घर, माझी मुलं नेहमी असत तश्शी होतो. धुवट साडी नेसलेली, केस कसेतरी गुंडाळलेले, स्वयंपाकाच्या ऐन वेळेला मीच जाऊन त्यांना दार उघडलं.

" या, या. बसा ना. खरं म्हणजे, मी स्पर्धेतून माघार घेतली आहे. तरी पण तुम्ही जेवायला थांबायला हरकत नाही. गोवर, क्लबची निवडणूक, माझी मुलं या सर्वांनी माझ्याविरुद्ध कट केला, ह्यामुळे मी स्पर्धेतून यशस्वी माघार घेतली आहे. तेव्हा..."

त्या अवाक् होऊन माझ्याकडे पाहतच राहिल्या. मग हळूहळू सगळ्यांच्याच चेहऱ्यावर हसू पसरू लागलं. " पाच दिवस आम्ही पाच घरी गेलो. सगळं कसं नीटनेटकं, स्वच्छ. मला तर बाई इतकं अवघडल्यासारखं झालं आहे ! पाच दिवस टिपटॉप राहून. बरं झालं इथं तरी आता जरा विसावा मिळाला–" एक परीक्षक–सौ. गुजर–ऐसपैस पाय पसरीत म्हणाल्या.

" प्रत्येकानं मनाला येईल तसं, वाटेल तसं राहावं, वागावं, असा या घराचा नियमच आहे. अहो, मन ठीक असलं तर सर्व ठीक असतं ना ?" मी म्हटलं.

दुसऱ्या परीक्षक बाई स्वयंपाकघरात डोकावत म्हणाल्या, " अय्या, हे काय तुम्ही करत आहात ? साखरपोळ्या, त्या कशाबाई करता तुम्ही ?"

मी चमकून त्यांच्याकडे पाहिलं. पण नाही, त्या कुत्सितपणे असं विचारत नव्हत्या हे त्यांची चर्याच सांगत होती. प्रत्येक स्त्री आपल्या घरी मुलांच्या समजुती-करता साखरपोळी, गोडपोळी करून देत असेल. पण 'त्या कशा करता' असं विचारून त्यांनी माझा गौरवच केला. माझ्या मनातलं आतापर्यंतचं काहूर एकदम शांत झालं. बच्चू सौ. काळे यांच्या मांडीवर बसला होता. मग आम्ही जेवायला बसलो. जेवताना काळे म्हणाल्या, " मुलं काय भराभरा वाढतात नाही ? माझी चारी मुलं पाखरासारखी उडून गेली. म्हणून मी आता असं क्लबात मन रमवते."

" हो खरंच, क्लबावरून मला आठवण झाली, माझ्या सासूबाई पण आजच त्यांच्या मंडळाच्या अध्यक्षा म्हणून निवडून आल्या. फारच चांगल्या आहेत हो त्या."

" तुमच्या सासूबाई तुम्हांला अडवतात ? माझ्याही सुनेला माझ्याबद्दल असंच वाटत असेल का ?" सौ. गुजर म्हणाल्या.

" हो, जरूर वाटत असेल. कदाचित् तुम्ही इतक्या व्यवस्थित नीटनेटक्या असता म्हणून ती बुजत असेल तुम्हांला. " मी बोलले. सौ. गुजर माझ्याकडे बघतच राहिल्या. मग त्या हळूहळू हसत म्हणाल्या, " अगबाई, तुला कसं ग कळलं ! सूनबाई कधी कधी मळकी साडी, फाटलेलं पोलकं घालून घरभर हिंडते, तेव्हा मात्र मला खरंच राग येतो. बरं ते जाऊ दे ! पण तू म्हणे आपल्या घराला अडचणीच्या वेळी आर्थिकदृष्ट्या साहाय्य केलंस, ते कसं ग !" मग मी त्यांना माझ्या कलाकृती दाखवल्या. परत एकदा चहापाणी झालं. नंतर त्या सर्व आनंदाने मुलांना ' टा ऽ टा ' करून, त्यांचे पापे घेऊन निघून गेल्या. अर्थातच् मी स्पर्धा जिंकली नाही. खरं म्हणजे मी स्पर्धेत उतरलेच नव्हते. तरी पण मी तीन छान नव्या मैत्रिणी मिळवल्या. त्यांच्याकडून मला एक पत्र आलं आहे. प्रशस्तिपत्र हो ! " खरोखरीच, तुम्ही आदर्श माता, आदर्श पत्नी, आदर्श गृहिणी आहात. तुमचं मन मोठं आहे, विशाल आहे. जरूर असेल तीच गोष्ट आधी हातीं घेणे व ती जबाबदारीने पार पाडणे हीच आदर्श स्त्री ओळखण्याची मुख्य खूण आहे. अशी पत्नी व अशी माता मिळाली म्हणून तुमचे पती व तुमची मुलं धन्य आहेत..." इतकं चांगलं पत्र वाचून माझे डोळे भरून आले. ज्या ज्या वेळी सगळं घर, सगळा समाज, सगळं जग माझ्यावर कोसळत आहे असे वाटते, त्या त्या वेळी हे पत्र काढून मी वाचीत बसते.

जानेवारी १९६८ अखेर, कविता-साहित्य स्वीकृत केले असल्यामुळे, साप्ताहिक 'माणूस'कडे येणाऱ्या यापुढील कवितांची दखल घेणे वेळेअभावी शक्य होणार नाही. त्याचप्रमाणे कोणत्याही साहित्यासोबत पुरेसे टपाल नसल्यास त्यासंबंधीचा पत्रव्यवहार करता येणार नाही. कृपया या अडचणीची नोंद घेतली जावी. —सं.

ज्वलंत राष्ट्रवादाच्या

भयानक दीप्तीचा

ललितभव्य आलेख

मूल्य पंचवीस रुपये

'माणूस'मधून प्रसिद्ध झालेल्या
प्रदीर्घ लेखमालेची सुधारित ग्रंथावृत्ती.

४१९ नारायण पेठ, पुणे २.

८ एप्रिल १९६७

# बिहार वार्तापत्र

# ४



पाटण्यापासून सुमारे ७० मैल असलेल्या नवादा या गया जिल्ह्यातील तालुक्याच्या गावाला गेल्या महिनाभरात एक विलक्षण स्वरूप प्राप्त झाले आहे. फाटके कपडे घालणाऱ्या अर्धनग्न लोकांची येथील संख्या एकाएकी वाढली आहे. जिकडे पाहावे तिकडे हे लोक हिंडताना दिसतात. त्यांत सर्व तऱ्हेचे लोक आहेत. अगदी लहान मुलांपासून तो म्हाताऱ्या-कोताऱ्यांपर्यंत! रेल्वे स्टेशनात, बस स्टँडवर, हॉटेलांच्या आजूबाजूला, बाजारात, धर्मशाळांपाशी सर्वत्र हे लोक मोठ्या संख्येने संचार करताना दिसतात. भिकाऱ्यांचा लोंढाच्या लोंढाच या गावात घुसलेला दिसतो.

पण हे लोक धंदेवाईक भिकारी नाहीत. त्यांच्यापैकी लहान मुले जरी सरळसरळ भीक मागत असली तरी मोठे स्त्री-पुरुष भिक्षा मागत नाहीत. ते नुसतेच हिंडून जे

# पोषणाचे आणि शोषणाचे

मिळेल ते खात असतात. हे लोक आजूबाजूच्या खेडचापाडचातून दुष्काळाने काही खायला न मिळाल्याने त्रस्त होऊन गावे सोडून आलेले आहेत. त्यांतील बहुसंख्य हरिजन आहेत. स्टेशनवर, धर्मशाळेत, हॉस्पिटलापाशी ते थांबतात. काम शोधण्याचा प्रयत्न करतात. कुणी काही खायला दिल्यास स्वीकारतात. गावात रिलीफ कमिटी-तर्फे चालणाऱ्या रसोडचांवर मुले-बायका जेवतात.

रिलीफ कमिटीचे धान्य जेव्हा रेल्वे स्टेशनवर येते आणि कमिटीचे कार्यकर्ते ते काढू लागतात, तेव्हा मात्र त्यांना राहवत नाही. धान्याच्या पोत्यांशी एकच झुंबड उडते. "भूके मर रहे हुजूर, दे दो अनाज," असे ओरडून एकच गर्दी करतात. झोंबाझोंबी करतात. कार्यालयात सुखरूपपणे धान्य आणणेही कठीण होऊन जाते. रसोडे जेव्हा चालतात तेव्हा किती लोकांना खायला घालावे याचाही कार्यकर्त्यांना प्रश्न पडतो.

अशी परिस्थिती आसपासच्या साऱ्याच गावांमध्ये झाली आहे. नवादा तालुक्यात बोध गयेप्रमाणेच हे तिसरेही वर्ष लागोपाठ कोरडे गेले आहे ! काही पिकलेच नाही. उदाहरणच द्यायचे झाले तर नवादा ब्लॉकमधील सिरदरा या गावचाही मुखिया रामप्रसादसिंह याच्या शेतात दरवर्षी कमीतकमी चारशे मण भात होतो; पण यंदा अवघा दहा मणही भात झालेला नाही. त्यामुळे लोक गाव सोडून चालले आहेत. फतेहपूर ग्रामपंचायतीतून तर एकदम २५० हरिजनांचा लोंढा आपली घरे-दारे सोडून अन्नाच्या शोधात निघून गेला आहे. ठिकठिकाणच्या गावांतून गरीब हरिजनांचे भूकबळी पडत असल्याच्या बातम्या आहेत. आमच्या गावात परवा दोन

मेले, आमच्या गावात गेल्या आठवड्यात तीन मूकबळी पडले, असे सांगणारे कितीतरी लोक मला नवादाच्या रिलीफ कमिटीच्या कचेरीत भेटले. रिलीफ कमिटीचे एक जबाबदार कार्यकर्ते श्री. लक्ष्मीनारायण सिन्हा यांनीही तसेच सांगितले. त्या गावी जाऊन आलो तो बोध गयेनजीकच्या खेड्यांमध्ये होती तशीच परिस्थिती इकडेही आहे.

रिलीफचे काम लोकांना वाचविण्यास पुरेसे नाही. नवादा गावच्या आसपास रिलीफ कमिटीचे तीन रसोडे आणि कॅथॉलिक ख्रिश्चनांचा एक, असे चार रसोडे चालतात; परंतु याच विभागासाठी एकूण वीस रसोड्यांची आवश्यकता आहे. आणि त्या हिशेबाने नवादा ब्लॉकमध्ये २०० रसोड्यांची आवश्यकता आहे. एवढे रसोडे निघाले तरच लोक वाचतील. एरवी नाही. सध्या एकूण गया जिल्ह्यातही एवढे रसोडे नाहीत.

बिहारात ज्या भागामध्ये अतितीव्र दुष्काळ पडला आहे त्यापैकीच नवादा विभागही आहे. बोध गया तालुक्याप्रमाणेच नवादा तालुकाही जसजसे दक्षिणेकडे जावे तसतसा अधिक खडकाळ होत जातो. साऱ्या नद्या कोरड्या. नवादा गावच्या शेजारची खुरी नदी ही कोरडी ठणठणीत आहे. नवादा गावात पाऊल ठेवल्याबरोबर आपण दुष्काळी भागात आल्याची एकदम जाणीव होते. भिकाऱ्यांची गर्दी, कोरडे धुळीचे रस्ते, पाण्याचे दुर्भिक्ष्य आणि रखरखीत तापणारे ऊन.

## राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे कार्य

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने जी बिहार अकालपीडित साहायता समिती स्थापन केली आहे त्या समितीचे प्रमुख काम नवादा विभागातच आहे. सिंचाईसाठी आणि पिण्यासाठी पाणी उपलब्ध करून देणे व जनावरांना चारा पुरविणे यावर या समितीचा विशेष भर आहे. कारण या विभागात अन्नाबरोबरच चाऱ्याचा आणि पाण्याचाही तुटवडा मोठ्या प्रमाणावर आहे. त्याचप्रमाणे आसपासच्या खेड्यांत निवडक गरजू लोकांना मोफत आटा पुरविण्याचे कामही समिती करते.

पाण्याच्या तजविजीसाठी समितीने विहिरींना बोअरिंग करण्याचे काम हाती घेतले आहे. "बोअरिंग करण्याची योजना आम्हीच प्रथम हाती घेतली," असे नवादाच्या एका स्वयंसेवकाने सांगितले. सध्या समितीचे ११ बोअरिंग प्लँट्स चालू आहेत आणि वीस विहिरींना यशस्वीपणे बोअरिंग होऊन पाणी लागले आहे. आणखी विहिरींवर काम चालू आहे. कुणाच्या विहिरीला बोअरिंग करण्याची गरज आहे, कुणाच्या गाईगुरांना मोफत चाऱ्याची गरज आहे, याची अगोदर काळजीपूर्वक पाहणी केली जाते. हे पाहणीचे काम संघाचे सुमारे ५०० बाल स्वयंसेवक करीत आहेत. अगोदर पूर्ण पाहणी करून ज्यांना खरोखरच गरज आहे अशांनाच आपल्या मदतीचा फायदा मिळावा, असा समितीचा कटाक्ष आहे.

स्वत: श्री. जयप्रकाश नारायण यांनी एका भाषणात रा. स्व. संघाच्या या कामाची स्तुती केली असल्याने मी मुद्दाम नवाद्याला या समितीचे काम पाहण्याचे ठरविले होते. आश्चर्याची गोष्ट ही की, समितीचे सारे काम अगदी तरुण मुले आणि प्रत्यक्ष खेड्यातील काम तर अगदीच लहान लहान स्वयंसेवक करताना दिसले. नवादा येथील समितीचे सूत्रधार श्री. श्रीधर प्रसाद हे तर फारच तरुण आहेत.

श्री. श्रीधर प्रसाद यांच्यावरोबर मी अकबरपूर आणि रजौली या विभागात जाऊन आलो. परिस्थिती अत्यंत वाईट. खेड्यामधील खालचे वर्ग तर मृत्यूच्या पंथा-वर आहेतच. पण मध्यमवर्गाची परिस्थिती शोचनीय आहे. अकबरपूर आणि रजौली या गावांतील दुकानदारांचे धंदे बसत चालले आहेत. काही व्यापारच होत नाही. सारा मध्यमवर्ग मेटाकुटीला आला आहे.

संघाच्या समितीने खोल केलेल्या विहिरी पाहिल्या. खनतर येथील श्री. हरिहर प्रसाद यांनी आपल्या खोल केलेल्या विहिरीत लगेच विजेचा पंप लावला आहे. त्यामुळे त्यांच्या शेतीतील २५ एकर जमीन भिजते. आजूबाजूच्या वैराण शेतांच्या पार्श्वभूमीवर त्यांचे हिरवे शेत त्यामुळे एकदम उठून दिसते. याचप्रमाणे ज्या ज्या विहिरींत बोअरिंगचे काम झाले आहे त्या प्रत्येक विहिरीपासून आता सुमारे १५ ते २५ एकर जमिनीला पाणी मिळते आहे.

"आम्ही साहाय्य करतो ते अधिक दूर दृष्टीने. लोकांना तात्पुरते जेवण देण्यापेक्षा कायमचे पाणी देणे अधिक चांगले," श्री. श्रीधर प्रसाद म्हणाले.

दुष्काळाच्या संकटात गरिबांचे पार वाटोळे होते. पण त्याचप्रमाणे मध्यमवर्गही फारच अडचणीत येतो. जे भुकेने मरताहेत त्यांच्याकडेच सारा मदतीचा ओघ जातो, पण वर काही न दाखविता आतल्या आत उपासमार सहन करणाऱ्या मध्यमवर्गाकडे सहसा कुणाचे लक्ष जात नाही. तिकडेच लक्ष पुरविण्याचे रा. स्व. संघाच्या समि-तीने ठरविलेले दिसते. तसेच प्रत्यक्ष कुणी सांगितले नसले तरी समितीचे एकूण कार्य पाहून माझी तशी समजूत झाली आहे.

आणखी बोअरिंग प्लँट्स् मिळविण्याचे समितीचे प्रयत्न चालू आहेत. संघाचे स्वयंसेवक मारवाडी रिलीफ सोसायटीने गोळा केलेला चारा जनावरासाठी वाटण्या-चेही काम करतात.

## मिशनऱ्यांची भोजनगृहे

संघाच्या समितीचे पटना येथील एक कार्यकर्ते श्री. उग्रदेव नारायण यांनी मला सांगितले, "आम्ही फंड गोळा करतो आहोत खरा; पण आम्हांला खरी गरज आहे शेतीविषयक उपकरणांची. बोअरिंग प्लँट्स्, पंपिंग सेटस्, नांगर, फावडी, कुदळी अशी उपकरणे जर आम्हांला लोकांनी दिली तर दुष्काळग्रस्तांना आम्ही अधिक चांगल्या तऱ्हेने मदत करू शकू."

नवादा येथेही कॅथॉलिक मिशनऱ्यांचे मदतीचे काम चालू आहे. या मिशनतर्फे

इथे चार-पाच मोफत भोजनगृहे मिळून सुमारे सहाशे मुलांना आणि स्त्रियांना अन्न दिले जाते. त्याचबरोबर धडधाकट पुरुषांना फुकट अन्न न देता त्यांना काही तरी काम देऊन अन्न देण्याचे धोरण मिशनने स्वीकारले आहे. हे काम कोणत्याही स्वरूपाचे असते. शेतकऱ्याने स्वतःच्या घराच्या डागडुजीचे काम केले तरी हरकत नाही. पण कोणती तरी मजुरी करावी.

मिशनऱ्यांच्या मदतीचा फायदा फक्त ख्रिश्चनांनाच मिळतो. त्यांच्या मोफत भोजनगृहामध्येही पक्षपात होतो, अशा तक्रारी होत्या. त्यांत बरेच तथ्य आहे. नवादाच्याच मिशनरी भोजनगृहासमोर अगदी पहाटेपासून बायामुलांची गर्दी जमू लागते. दुपारी बारानंतर भोजनगृह सुरू होते. फाटकातून एकेकाला आत सोडले जाते. या आत सोडण्यामध्येच पक्षपात होतो. ख्रिश्चनांना आधी सोडण्यात येते. मग हिंदूंना. एका राजकीय कार्यकर्त्याने मिशनच्या फादरजवळ याची तक्रार केली, तेव्हा फादर म्हणाले, "तुम्ही असे का म्हणता? भुकेल्यांना जेवू घालताना आम्ही मुळीच पक्षपात करीत नाही. हिंदू, ख्रिश्चन सारे आमच्याकडे जेवतात." मलाही असेच सांगण्यात आले. मजुरीची कामे मात्र फक्त ख्रिश्चनांनाच देण्यात येतात. हे ख्रिश्चन मिशनरी हिंदूंना जबरदस्तीने धर्मांतर करावयास लावत नसले तरी ख्रिश्चनांना मिळत असलेले फायदे पाहून गरीब हिंदूंनाही हेवा वाटतो. आणि विशेषतः अगदी खालच्या जातीतील हरिजनांना बिहारात इकडच्या रिपब्लिकन पक्षासारखी बांधून ठेवणारी संघटना नसल्यामुळे ते जीव जगविण्यासाठी खुषीने धर्म बदलतात. पण ही संख्या फार मोठी नाही. नवादामधील हरिजन कार्यकर्त्यांना मी खोदून खोदून विचारले तरी एवढ्यात नवादामध्ये एकदम एखाद्या कुटुंबाने धर्मांतर केल्याचे मला ऐकू आले नाही. ख्रिश्चनांच्या रसोड्यांत न जेवण्याची प्रतिज्ञा करणारी हरिजन कुटुंबेही आहेत.

कॅथॉलिक मिशनचे बिहारमधील दुष्काळग्रस्तांच्या एकूण मदतीचे काम मोठ्या प्रमाणावर आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणावर बिहार रिलीफ कमिटीच्या खालोखाल या मिशनचेच काम आहे. मिशनच्या दुष्काळग्रस्तांच्या मदतीचे बिहारमधील सर्व कामाचे सूत्रधार फादर डोना ह्यू यांना मी पटन्यात भेटलो. त्यांनी सांगितलेले आकडे मोठे आहेत. अर्भकांच्या वाढीसाठी लागणारे खास जीवनसत्त्वे असणारे दूध मिशनतर्फे सध्या सुमारे १४ हजार दुष्काळग्रस्त मुलांना पुरविण्यात येत आहे. ही संख्या एक लाखापर्यंत नेण्याचा मिशनचा प्रयत्न आहे. ऑक्सफामच्या मदतीने हे काम मिशन करते. त्याचबरोबर मिशनतर्फे दुष्काळग्रस्त विभागात एकूण ४० हजार लोकांना मोफत अन्न पुरविले जाते. आणि १६ हजार पुरुषांना रोज कामे दिली जातात. दुष्काळाची तीव्रता जसजशी वाढत जाईल तसतसे आम्ही आमचे कामही वाढवू, असे फादर डोना ह्यू यांनी सांगितले. या कॅथॉलिक मिशनला सर्व जगातून फंड मिळतो. केअरचे दूध बऱ्याच ठिकाणी मिशनतर्फेच वाटले जाते. ऑक्सफाम

सर्व ठिकाणी मिशनच्या सहकार्यानेच काम करते. जगातील सर्व चर्चेसमधून मिशनच्या या मदत कार्याला पैशाचा, धान्याचा आणि इतर गोष्टींचा पुरवठा होतो आहे. नवादा विभागात ऑक्सफामचे दूध वाटले जाते, तेथील कॅथॉलिक मिशनच्या सहकार्यानेच.

## अन्याय आणि भ्रष्टाचार


नवादा विभागात मी वेगवेगळ्या राजकीय पक्षांच्या सामान्य कार्यकर्त्यांना भेटलो. संयुक्त समाजवादी आणि जनसंघ हे दोन पक्ष सोडले तर इतर कुठल्याच पक्षाचे कार्यकर्ते इथल्या रिलीफ कामात विशेष रस घेत नाहीत. पण वेगवेगळ्या कार्यकर्त्यांकडून मला बरीच माहिती कळली. दुष्काळाच्या दिवसांमध्येही कसा अमानुष भ्रष्टाचार चालतो, मानवतेच्या साऱ्या मर्यादा कशा पायदळी तुडविल्या जातात, पाषाणहृदयी प्रवृत्तींचे कसे राक्षसी प्रदर्शन होते हे आधी समजले होतेच. त्यातच नवादा येथे आणखी काही भयंकर गोष्टी कळल्या.

नवादा विभागातील सगौला, हदसा, दोना, ननवरा आणखी अशीच कित्येक गावे आहेत की जेथील हरिजनांची शेकडो बिघा जमीन नुसतीच पडून आहे. नुसत्या हदसा गावची अशी ३५० बिघा जमीन पिकांवाचून गेली काही वर्षे पडून आहे. कारण काय तर हरिजनांनी काढलेल्या कर्जाच्या बदल्यात ती जमीन गहाण म्हणून गेली. कर्जाचे हिशेब नाहीत आणि सावकार म्हणतात, कर्ज फेडल्याशिवाय ती जमीन कसू देणार नाही. संयुक्त सोशॅलिस्ट पक्षाचे हरिजन कार्यकर्ते श्री. बन्सीदास आणि श्री. मानसिंग यांनी मला हे सांगितले. हे दोघेही दुष्काळग्रस्त आहेत. दिवस दिवस खायला मिळत नाही. समाजकार्य करतात. बाहेर जिथे खायला मिळेल तेवढेच. आणि अशी जमीन कित्येक गावांमध्ये पडून आहे. "कमीत कमी ती जमीन आम्हांला कसू तरी द्या, असे अर्ज सरकारात करकरून आम्ही थकलो. पण काही होत नाही! गेल्या दोन-तीन वर्षांपासून अशा जमिनी पडून आहेत," बन्सीदासनी सांगितले.

जे लोक दुष्काळाने अतिशय ग्रस्त आहेत आणि कमाईचे ज्यांना साधन नाही अशांनाही बिहार सरकारने लाल कार्डस् काढली आहेत. त्यांवर काही रेशन फुकट दिले जाते. या कार्डस्चे अजून व्यवस्थित वितरणच व्हायचे आहे. पण जिथे होते तिथे अनेक तऱ्हेचे गैरप्रकार चालतात. मधल्या मध्येच काही कार्डस् गडप होतात. "आमच्या गावचा मुखिया आपल्या शेतात जो फुकट मजुरी करतो त्यालाच लाल कार्ड देतो" असे मानसिंग नावाच्या हरिजनाने सांगितले.

रेशनचे धान्य विकत घेण्याची ज्यांच्यांत ताकद नाही, त्यांच्या धान्याचे काय होते? नवादा ब्लॉकमध्ये असलेल्या चमरडिहा या गावातील एका दुकानदाराला काही कार्यकर्त्यांनी पकडले. हा दुकानदार हरिजनांची रेशनकार्डस् घेऊन ठेवायचा. त्यांच्या सर्व मापांवर खुणा मारून ते सारे धान्य कार्डधारकाने घेतले असे दाखवायचा. खरे म्हणजे तेवढे धान्य विकत घेण्याची त्यांची कधीच ताकद नसायची.

[ पृष्ठ ३४ वर ]



# राजा

लेखक

चतुर्थ आवृत्ती
प्रसिद्धिनंतर किंमत
**रुपये चाळीस**

ग्रंथ रजिस्टर पोस्टाने घरपोच
हवा असल्यास तीन रुपये अधिक

**ठेव योजना**



# शिवछत्रपती

ब. मो. पुरंदरे

प्रसिद्धी १५ ऑगस्ट १९६७
प्रसिद्धिपूर्व किंमत
**रुपये सत्तावीस**

प्रसिद्धिपूर्व ग्राहक – नोंदणीची
अखेरची मुदत ३१ मे १९६७

मुखपृष्ठ क्रमांक ३ पाहा.

दुकानदारच मधल्या मध्ये ते धान्य गडप करून ते काळ्या बाजारात न्यायचा नवादाच्या सं. सो. पा. कार्यकर्त्यांनी एकाच गावची अशी २९ कार्डस् पकडली. हा पुरावा मी स्वतः पाहिला. लोकांनी अनेक अर्ज केले. पण त्या दुकानदारावर अजून कोणतीही कारवाई झाली नाही.

आणि सर्व ठिकाणी हाच गोंधळ आहे. पैसे नाहीत म्हणून जे धान्य हरिजन घेऊ शकत नाही आणि ज्याविना तो तडफडत मरतो आहे तेच धान्य काळ्या बाजाराची वाट चालू लागते आणि दुकानदाराच्या घराचे इमल्यावर इमले उठतात. "हे सर्व पाहिले की असा संताप येतो. लोकशाही समाजवाद, न्याय–काही काही खरे नाही असे वाटू लागते," असे श्री. लक्ष्मीनारायण सिन्हा हे रिलीफ कमिटीचे कार्यकर्ते म्हणाले.

सरकारतर्फे दुष्काळग्रस्तांना काही अटींवर विहिरीचे पाणी ओढण्यासाठी विजेचे पंप कर्जावर मिळतात. पण वाटेल त्याला–गरज असलेल्या माणसाला–हे पंप मिळत नाहीत; कारण पंप मिळवताना मधल्या मध्ये बऱ्याच जणांचे हात ओले करावे लागतात. त्यामुळे ते हात जो ओले करू शकेल, अशाच माणसांना हा फायदा मिळतो. मग एवढा प्रयत्न करून पंप मिळविणारा साधारण सुखी असलेला शेतकरी स्वस्थ थोडाच बसणार ? ज्यांना पंपांची खरोखरच गरज आहे, अशांना तो हा पंप चक्क भाड्याने वापरायला देतो आणि भाड्याचे पैसे खिशात घालतो.

आणखी एक विलक्षण गोष्ट कळली. बिहारात दुष्काळग्रस्तांच्या मदतीचे काम करणारी एक अखिल भारतीय संस्था आहे. या संस्थेच्याच गया जिल्ह्यातील एका कार्यकर्त्याने ही गोष्ट मला सांगितली. या संस्थेला जिल्ह्यात एका ठिकाणी मदत केंद्र उघडायचे होते व त्यासाठी धान्याची १०० पोती त्या केंद्राला पाठवायची होती. केंद्राची जबाबदारी त्या कार्यकर्त्यावर येणार होती. संस्थेच्या मदत कार्याचे जिल्ह्यातील जे सूत्रधार होते त्यांनी या कार्यकर्त्याला बोलावून घेतले आणि सांगितले, "शंभर पोती मिळाली आहेत, अशी सही करा आणि पन्नास वाटपासाठी घेऊन जा. बाकीच्या पन्नास पोत्यांचे पुढे काय करायचे ते आपण दोघे मिळून नंतर ठरवू."

या कार्यकर्त्याने अर्थातच चक्क नकार दिला. मी त्याला विचारले, "या गोष्टीला पुरावा काय ?" तो म्हणाला, "तोंडी बोलाचालीला पुरावा कोठून देणार ? पण मीही त्या संस्थेचा पदाधिकारी आहे. (त्याने त्या संस्थेचे लेटरहेड मला दाखविले) संस्थेबद्दल मला अभिमान आहे. माझ्याच संस्थेची बदनामी मी कशी करू ? पण या गोष्टी पाहिल्या म्हणजे सारे झूट वाटू लागते. संताप येतो. स्वातंत्र्यपूर्व काळात मी क्रांतिकारक होतो. आताही वाटते, हाती पिस्तुल घ्यावे आणि या नराधमांना उडवीत सुटावे.—"

सामाजिक सेवा करणाऱ्या सार्वजनिक संस्थेमध्ये दुष्काळाच्या काळात असा भ्रष्टाचार होतो ! मग सरकारी क्षेत्रात किती बजबजपुरी माजली असेल याची

कल्पनाच केलेली बरी ! ठिकठिकाणी अशी उदाहरणे नजरेसमोर येतात. विश्वास बसत नाही, अशा गोष्टी ऐकायला मिळतात. लोक तक्रारी करतात, अर्ज करतात. पण दखल घेतली जात नाही. कुणावर कारवाई होत नाही. अशी कारवाई झालीच तर वरपासून खालपर्यंत सारेच अधिकारी त्यात गुंतण्याचा संभव असतो. त्यामुळे लोकांनी आपणहून अशा लोकांना पकडून दिले तरी त्यांच्याकडे दुर्लक्ष होते.

भूकबळी पडले तरी त्यांची दखल घेतली जात नाही. कुणी उपासमारीने मेले यावर विश्वास ठेवायला अधिकारी तयार नसतात; कारण त्यांच्यावर ठपका येण्याचा संभव असतो. दुसऱ्याच कोणत्या रोगाने ते मेले असावेत, असे ते म्हणतात

## ‘ उत्तर मिळणार नाही ’

असे सारे चित्र भयाण आहे. आता बिहारमध्ये विरोधी पक्षांचे सरकार आले आहे. या नव्या सरकारची पहिली घोषणा आहे ती ही की दुष्काळाचा आणि लाच-लुचपतीचा निकराने मुकाबला करायचा. सारे लोक आशेने पाहत आहेत; पण सरकारी यंत्रणा गतिमान व्हायला नेहमीच वेळ लागतो. त्यातल्या त्यात ही अशी २० वर्षांच्या गैरकारभाराने किडलेली यंत्रणा. दुष्काळग्रस्तांच्या मदतीची सरकारी कामे नवे सरकार येऊन पंधरा दिवस उलटून गेले होते तरी गतिमान झाली नव्हती. काही कार्यकर्त्यांना एक फार मोठी भीती भेडसावते आहे. अन्नाच्या कमतरतेमुळे शेतकरी मरत आहे. नवा पाऊस पडेल तेव्हा तो पेरण्यासाठी दाणा कुठून आणणार ? पेरणीचे दिवस येण्यापूर्वी प्रत्येक शेतकऱ्याला शेत पेरण्यापुरते दाणे पोचायला हवेत आणि या दाण्यांची, ते पोचविण्याची सरकारने आतापासूनच तजवीज करायला हवी. सरकारी अधिकाऱ्यांच्या लक्षात ही गोष्ट आहे की नाही कुणास ठाऊक ! पण कार्यकर्ते मात्र ओरडताहेत. पेरणीसाठी वेळेवर दाणा मिळाला नाही तर अक्षरशः आणखी एका कृत्रिम दुष्काळाला बिहारी शेतकऱ्यांना तोंड द्यावे लागेल.

आणि याही वर्षी पाऊस आलाच नाही तर ? तर मात्र मोठीच आपत्ती बिहार-वर कोसळणार आहे. आणि हीही आपत्ती येण्याची शक्यता अगदीच नाकारून चालणार नाही. कारण बिहारमधील पावसाचे आगमन नेहमीच अनियमित असते.

या साऱ्या शक्यता लक्षात घेऊन कुणी दूरदृष्टीने प्रयत्न करीत आहे का, याचा मला तपास घ्यायचा होता. गेल्या पंधरा–वीस वर्षांत बिहारात तीन–चार दुष्काळ आले. हा तर त्या सर्वांवर कडी करणारा दुष्काळ ठरला. पुन्हा भविष्यात असे संकट येऊ नये म्हणून काही कायम स्वरूपाची योजना आखली जात आहे का, याचे मला उत्तर हवे होते, पण कुठेच समाधानकारक उत्तर मिळत नव्हते.

पटन्याचे एक जबाबदार दैनिक ‘ सर्चलाईट ’ या पत्राचे संपादक श्री. सुभाषचंद्र सरकार यांना मी हे सांगितले, तेव्हा ते म्हणाले, “ तुम्हांला उत्तर मिळणारच नाही. कारण कुणाजवळच उत्तर तयार नाही. ”

●



श्रीमती सुमतीबेन मोरारजी

बिहारच्या दुष्काळ निवारण-कार्यात उद्योगपतींना सहभागी करून घेण्याचा जयप्रकाशजींचा निकराचा प्रयत्न सुरू आहे. यासाठी गेल्या महिन्याभरातच मुंबईला त्यांच्या दोन फेऱ्या झाल्या. जयप्रकाशजींच्या या कार्यात त्यांना मनापासून साथ देणाऱ्या उद्योगपतींत एक आहेत श्रीमती सुमतीबेन मोरारजी, सिंदिया स्टीम नॅव्हिगेशन कंपनीच्या कर्तबगार संचालिका. बिहार साहाय्यता समितीच्या त्या कार्यकारी विश्वस्तही आहेत. बिहारचा पाहणी-दौरा सुरू करण्यापूर्वी ' माणूस प्रतिनिधी 'ने त्यांची मुंबई येथे भेट घेतली. या भेटीवर आधारलेला हा छोटासा लेख.

# " आपल्या संस्कृतीची महानता

# आपण विसरता कामा नये."

श्रीमती सुमतीबेन मोरारजी या सुप्रसिद्ध उद्योगपती श्री. मथुरादास गोकुळदास यांच्या एकुलत्या एक कन्या. पिताजींच्या कापड गिरण्यांच्या प्रचंड व्यवसायात त्यांनी आपणहून हौसेने लक्ष घातले. पुढे त्यांचे सासरे शेठ नरोत्तमदास मोरारजी यांनी त्यांना उद्योगात आणि प्रशासनात लक्ष घालण्यास व त्यासंबंधीचा अभ्यास करण्यास अधिकच उत्तेजन दिले.

शेठ नरोत्तमदास हे भारतातील अग्रक्रमाच्या उद्योगपतींपैकी एक. शुद्ध राष्ट्रीय पायावर देशी जड उद्योगधंदे उभारण्यासाठी त्यांनी अपार कष्ट केले. ब्रिटिश कंपन्यांशी स्पर्धा करीत त्यांनी अनेक उद्योगधंद्यांत भारतीयांना स्थान मिळवून दिले. भारतातील नौकानयन उद्योगाचा पाया त्यांनीच घातला. त्यांच्याच प्रयत्नांनी १९१९ साली सिंदिया स्टीम नॅव्हिगेशन कंपनीची स्थापना झाली. नौकानयनाच्या आधुनिक व्यवसायात एवढ्या मोठ्या प्रमाणावर भाग घेणारी सिंदिया कंपनी ही पहिलीच भारतीय संस्था होती. ५ एप्रिल १९१६ साली सिंदिया कंपनीची पहिलीच

बोट खुल्या सागरात भारतीय कंपनीचा ध्वज प्रथमच फडकावीत इंग्लंडच्या दिशेने रवाना झाली. निळ्या पार्श्वभूमीवर पांढऱ्या शुभ्र वर्तुळात लाल रंगान काढलेले स्वस्तिक हा तेव्हाचा कंपनीचा ध्वज अजून कायम आहे. भारतीय राष्ट्रीयत्वाचे आणि संस्कृतीचे प्रतीक म्हणून हे चिन्ह कंपनीने वापरले.

राष्ट्रीय स्वयंपूर्णतेचे ब्रीद घेऊन जन्माला आलेल्या या कंपनीला प्रथमपासूनच प्रवासी व मालवाहतुकीची ठिकठिकाणी मक्तेदारी घेतलेल्या ब्रिटिश आणि इतर परदेशी कंपन्यांशी लढावे लागले आणि हा झगडा शेठ नरोत्तमदास यांनी मोठ्या धडाडीने चालविला. १९१९ पासून कंपनीने हा झगडा सुरू केला, तेव्हा कुठे १९५१ साली स्वातंत्र्यानंतर भारतीय किनारा भारतीय नौकानयनासाठी परदेशी कंपन्यांकडून खुला झाला. असा राष्ट्रीय वृत्तीचा पाया असलेल्या या संस्थेशी स्वातंत्र्य चळवळीमधील–विशेषत: काँग्रेसमधील– बऱ्याच नेत्यांचा जवळचा संबंध आला होता. याला कारण, शेठ नरोत्तमदास, महात्मा गांधी, सरदार पटेल, सुभाषचंद्र बोस, डॉ. राजेंद्र प्रसाद आणि जवाहरलाल नेहरू हे भारतीय आर्थिक स्वावलंबनाचे प्रतीक म्हणून प्रथमपासूनच या कंपनीकडे पाहत होते.

शेठ नरोत्तमदास हे अतिशय उदारमतवादी आणि स्त्री–शिक्षणाचे पुरस्कर्ते होते. आपल्या स्नुषा श्रीमती सुमतीबेन मोरारजी यांना त्यांनी उद्योगधंद्यातील पहिले धडे दिले. आणि या व्यवसायाविषयी त्यांच्या मनात आपलेपणा निर्माण केला, त्यामुळेच १९२९ साली त्यांचे निधन झाल्यावर सिंदिया कंपनीच्या कामाला श्रीमती सुमतीबेन मोरारजी यांनी स्वत:ला पूर्णपणे वाहून घेतले. तेव्हापासून कंपनीच्या त्या एक महत्त्वाच्या घटकच बनल्या आहेत. आज त्या सिंदिया स्टीम नॅव्हिगेशन कंपनीच्या प्रमुख संचालक तर आहेतच; पण त्याचबरोबर नौकानयन क्षेत्राशी संबंधित अशा अनेक संस्थांच्या त्या पदाधिकारी आहेत.

## राष्ट्रीय विश्वस्ताची भूमिका

श्रीमती मोरारजी यांनी आपल्या पिताजींची आणि सासऱ्यांची धडाडी उचलली आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली सिंदिया कंपनीने झपाट्याने प्रगतीच्या दिशेने पावले टाकली. कंपनीची स्थापना झाली तेव्हाच नौकाबांधणीच्या क्षेत्रात शिरण्याचे कंपनीच्या संस्थापकांच्या मनात होते. सिंदिया स्टीम नॅव्हिगेशन कंपनीच्या नौकाबांधणी यार्डाचा पायाभरणी समारंभ १९४१ साली तेव्हाचे काँग्रेसचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र प्रसाद यांच्या हस्ते विशाखापट्टम येथे झाला. भारतात तयार झालेले पहिले आधुनिक जहाज याच यार्डातून १९४८ साली बाहेर पडले आणि याच यार्डाचे पुढे १९५२ मध्ये हिंदुस्थान शिपयार्ड लिमिटेड, या राष्ट्रीय यार्डात रूपांतर झाले. सिंदिया कंपनी ही आशियातील सर्वांत मोठी शिपिंग कंपनी समजली जाते. आज कंपनीची एकूण सुमारे ३ लाख ७१ हजार टनांची ५७ प्रचंड जहाजे सबंध जगभरच्या सागरातून मालाची आणि प्रवाशांची नेआण करीत संचार करीत आहेत.

मोरारजी कुटुंबाशी महात्मा गांधींचा घनिष्ठ संबंध आला होता. त्यामुळे त्यांच्या विचारसरणीचा श्रीमती सुमतीबेन यांच्यावर फार मोठा प्रभाव पडला आहे. उद्योगधंद्याविषयीच्या त्यांच्या कल्पना वेगळ्या आहेत. त्या म्हणतात, " उद्योगपतींनी आता काळाची पावले ओळखून वागले पाहिजे. स्वतःला उद्योगधंद्याचे मालक समजून न वागता उद्योगधंद्याचे राष्ट्रीय विश्वस्त अशी भूमिका ठेवून त्यांनी लोककल्याणाचे कार्य केले पाहिजे– "

नौकानयनविषयक आंतरराष्ट्रीय परिषदांना उपस्थित राहण्यासाठी श्रीमती सुमतीबेन मोरारजी या अनेक वेळा ब्रिटनला जाऊन आल्या आहेत. भारतातील आणि युरोपातील बहुतेक महत्त्वाच्या बंदरांना भेटी देऊन त्यांच्या कार्यपद्धतीचा त्यांनी जवळून अभ्यास केला आहे. जगातील सर्व सागरांत संचार करणाऱ्या सिंदिया कंपनीच्या ५७ जहाजांची नावे त्यांच्या तोंडावर आहेत; एवढेच नव्हे तर एकेका जहाजाचा इतिहास, त्याची वैशिष्टये, त्याच्यांतील उणिवा, गुण आपल्या मुलींचे कौतुक करावे तशा प्रेमाने त्या सांगू शकतात.

संसदीय समितीपुढे संपत्तीकर विधेयक आणि व्यापारी नौकानयन विधेयक यांवर चर्चा करण्यासाठी त्यांनी १९५७ साली दोन शिष्टमंडळांचे नेतृत्व पत्करले होतें. नौकानयनाच्या उद्योगधंद्यावरील कर माफ करून घेण्यात त्यांचेच फार मोठे प्रयत्न होते. नौकानयनाच्या व्यवसायात त्यांनी बजाविलेल्या कामगिरीचे चीज म्हणूनच की काय, त्या इंडियन नॅशनल स्टीमशिप ओनर्स असोसिएशनच्या अध्यक्षपदी लागोपाठ १९५७ ते १९५९ अशी तीन वर्षे निवडून आल्या. १९६४–६५ सालीही त्यांची पुन्हा निवड झाली. श्रीमती सुमतीबेन या नौकानयन क्षेत्रातील अशी जागा भूषविणाऱ्या एकटयाच महिला आहेत.

१९४२ च्या 'भारत छोडो' चळवळीत श्रीमती सुमतीबेन मोरारजी यांनी सक्रीय भाग घेतला होता. महात्मा गांधी आणि राष्ट्रीय काँग्रेसचे इतर पुढारी त्यांच्या मुंबईच्या जुहू येथील निवासस्थानी कित्येक वेळ उतरत. स्वातंत्र्य चळवळीतील कितीतरी भूमिगतांना त्यांच्या घरी आसरा असे. अशा वातावरणात वाढल्यामुळेच श्रीमती सुमतीबेन यांचा स्वभाव अतिशय मनमिळाऊ आणि प्रेमळ बनला आहे. कचेरीतील अधिकारी, व्यवस्थापक, कारकून, शिपाई असा भेदभाव त्या करीत नाहीत. म्हणूनच त्यांच्या ऑफिसमधील शिपायापासून तो अधिकाऱ्यांपर्यंत कोणीही त्यांच्याशी मोकळेपणाने गप्पा मारू शकतो. त्यांचा मोकळा स्वभाव, धंद्याचे गाढे ज्ञान आणि कुशाग्र बुद्धिमत्ता यांमुळेच त्यांच्या शब्दाला अधिकार आला आहे. त्यामुळेच स्त्रियांना परक्या समजल्या गेलेल्या व्यवसायात त्या सहजतेने वावरतात. सतत पुरुषांबरोबर उद्योगधंद्यावर बोलण्यास, त्यावर चर्चा करण्यास त्यांना काहीच अवघड जात नाही. त्या म्हणतात, " मी स्त्री आहे म्हणून मला वेगळी वागणूक मिळावी, अशी अपेक्षा मी कधीच करीत नाही. उलट बरोबरीच्या सहकाऱ्यांप्रमाणे

मला वागणूक मिळावी, असा माझा आग्रह असतो; आणि त्यामुळेच मी सहजतेने वावरू शकते."

"उद्योग, प्रशासन, व्यापार आदी क्षेत्रांत भारतीय स्त्रिया का मागे राहिल्या असे तुम्हांला वाटते?" असा प्रश्न 'माणूस' प्रतिनिधीने विचारता श्रीमती सुमतीबेन जरा आग्रही स्वरांत म्हणाल्या, "पण भारतीय स्त्री कधीच मागासलेली राहिली नाही. भारताचा प्राचीन इतिहास चाळून पाहिला तर जीवनाच्या सर्व क्षेत्रांत भारतीय स्त्रिया तडफेने चमकल्या आहेत. मध्यंतरीच्या काळात स्त्रिया मागे पडल्यासारखे वाटत होते; परंतु महात्मा गांधींच्या प्रेरणेने भारतीय स्त्रियांमध्ये पुन्हा एक नवी जागृती आली. आजही कितीतरी क्षेत्रांत भारतीय स्त्रिया प्रामुख्याने चमकत आहेत. भारताचे पंतप्रधान कोण आहे? कितीतरी उच्च पदे भारतीय स्त्रिया भूषवीत आहेत. स्त्रिया मागासलेल्या आहेत हा समजच चुकीचा आहे."

## स्त्रिया आणि प्रशासन

"प्रशासन, व्यवस्थापन, उद्योग, व्यापार आदी क्षेत्रांमध्ये काही खास गुण लागतात ना? ते गुण स्त्रियांमध्ये असतात असे तुम्हांला वाटते काय?"

"खात्रीने" श्रीमती सुमतीबेन म्हणाल्या, "बुद्धिमत्ता, कार्यक्षमता, सहनशीलता या बाबतींत स्त्रिया पुरुषांना मुळीच हार जाणार नाहीत. स्वतःचे घर सांभाळणे हे प्रशासनाचे मोठे कठीण काम आहे. आपल्याकडच्या वृद्ध स्त्रिया किती कुशलतेने मोठी एकत्र कुटुंबे सांभाळतात! ते काही सोपे काम नसते. स्त्रियांच्या प्रशासनाच्या गुणाबद्दल शंका घेण्याचे कारणच नाही."

स्वतः सुमतीबेन शिपिंगसारख्या किचकट व्यवसायाचे काम सांभाळून घरगुती कामेही करतात आणि याचा त्यांना अभिमान वाटतो. इतर देशांतील स्त्रियांपेक्षा भारतीय स्त्रिया अधिक पुढारलेल्या आहेत, असे त्यांना वाटते; कारण पाश्चात्त्य देशांमध्ये जसजशी औद्योगिक प्रगती होत गेली तसतसे स्त्रियांना अधिकाधिक हक्क प्राप्त करून घेण्यासाठी भांडावे लागले. स्त्री-पुरुषांच्या समानतेची कल्पना पाश्चात्त्यांना परिस्थितीनुसार शिकावी लागली. या उलट भारतीय संस्कृतीतच स्त्रीला सन्मानाचे स्थान आहे. स्त्रीच्या उच्चत्वाची कल्पना भारतावर वरून लादण्यात आली नसून भारताच्या मूलभूत मूल्यांचा तो एक भाग आहे. स्त्रियांचा पवित्र दर्जा हे भारतीय संस्कृतीचे अनुस्यूत सौंदर्य आहे, असे सुमतीबेन यांना वाटते.

श्रीमती सुमतीबेन यांचे वय ५८ वर्षांचे असले तरी त्यांचा कामाचा झपाटा विलक्षण आहे. वेळात वेळ काढून त्या भारतातील नौकानयनाच्या प्रगतीचा अभ्यास करतात. या विषयावर त्यांनी एक छोटासा अभ्यासपूर्ण निबंधही लिहिला आहे. गेल्या पाच हजार वर्षांत भारतात नौकानयनाचा आणि नौकाबांधणी शास्त्राचा

विकास कसकसा झाला या विषयीचे एक प्रदर्शन त्यांनी दिल्लीत भरविले होते. ते अत्यंत यशस्वी झाले. नौकानयन, नौकाबांधणी या विषयांवर त्यांनी अद्ययावत ग्रंथांचे उत्तम संग्रहालय जमविले आहे. शिपिंगचा उद्योग हा श्रीमती सुमतीबेन यांच्या जीवनाचा स्थायीभाव आहे.

असे जरी असले तरी श्रीमती सुमतीबेन या अत्यंत भाविक आणि रसिक आहेत. ऐतिहासिक महत्त्वाच्या आणि कलापूर्ण अशा पुराणवस्तू गोळा करून त्या जतन करून ठेवण्याचा त्यांना छंद आहे. त्यांच्या ऑफिसात जगाचे नकाशे, जहाजाची मॉडेल्स, त्याबरोबरच देवदेवतांच्या सुंदर कोरीव मूर्ती आणि काही वैशिष्टचपूर्ण पुराणवस्तू कलापूर्ण रीतीने मांडून ठेवल्या आहेत. विविध कलांवरची दुर्मिळ पुस्तके, जुन्या दगडाच्या वस्तू, चित्रे, कापड, पुतळे यांचा मोठा संग्रह श्रीमती सुमतीबेन यांच्याकडे आहे. तसेच महात्मा गांधींच्याही कित्येक वस्तू त्यांनी काळजीपूर्वक जतन करून ठेवल्या आहेत. या सर्व संग्रहाचे राष्ट्रीय विश्वस्त निधीत रूपांतर करावा अशी त्यांची इच्छा आहे.

नौकानयन विषयावरील त्यांनी उभारलेले ग्रंथालय भारतात सर्वांत मोठे आहे. या ग्रंथालयाचे उद्घाटन १९६१ साली श्री. यशवंतराव चव्हाण यांच्या हस्ते झाले. नौकानयनावर एक मोठे संग्रहालय उभारण्याचा त्यांचा बेत आहे व त्यासाठी त्यांची तयारी चालू आहे.

इंग्रजी आणि गुजराथी या भाषांबरोबरच मराठी आणि हिंदी याही भाषा श्रीमती सुमतीबेन सफाईदारपणे बोलतात. आज त्या भारतातील पहिल्या दर्जाच्या उद्योगपती असल्या तरी त्यांची राहणी आणि वागणे अगदी साधे आहे. आपल्या उद्योगाकडे त्या वेगळ्या दृष्टिकोनातून पाहतात. त्याकडे शुद्ध व्यापारी दृष्टीने पाहण्याऐवजी एक राष्ट्रीय जबाबदारी म्हणून त्या आपल्या व्यवसायाकडे बघतात. नौकानयनाच्या धंद्याला भारतात आता यापुढे उज्ज्वल भविष्य आहे याची त्यांना खात्री आहे. त्या म्हणतात,

"नौकानयनाचा आपला इतिहास हा केवळ योगायोगाचा इतिहास नव्हे. तो आपला खास वारसा आहे. हा वारसा आपण कटाक्षाने जपला पाहिजे. त्याचा सर्वांगाने काळजीपूर्वक अभ्यास केला पाहिजे आणि तो मोठ्या अभिमानाने आपण पुढे चालविला पाहिजे."

भारतीय संस्कृतीवर त्यांची अढळ निष्ठा आहे. त्या म्हणतात, "संस्कृती, धर्म आणि प्रशासन यांचे बेमालूम मिश्रण भारतीय समाजव्यवस्थेत आहे. भारतीय संस्कृती हीच अशी आहे की, आजूबाजूचे सारे काही ती आपणांत सामावून घेते आणि स्वतःच उन्नत होते ही आपल्या संस्कृतीची महानता आपण विसरता कामा नये."

●

# मराठी कादंबरीची

# जुनी परंपरा मोडणारी

वि. शं. पारगावकर


श्री. ना. पेंडसे; मराठी कादंबरीत यशस्वी झालेले हे नाव आहे. पेंडसे फलकावर आले त्यापूर्वी गो. नी. दांडेकर हे लेखक झालेले होते. इतकेच नव्हे तर कादंबरीलेखनातही त्यांनी काही कामगिरी बजाविली होती; परंतु नाव व्हावे एवढा दम तेव्हा तिच्यात नव्हता. पेंडसे यांनीही 'एल्गार' लिहिली, तेव्हादेखील तिच्यामुळे त्यांचे नाव झाले नव्हते. पुढे त्यांनी 'गारंबीचा बापू' लिहिली आणि मराठीच्या कादंबरीक्षेत्रात नवे चैतन्य निर्माण झाले. ना. सी. फडके बिचारे वर्षाला दोन कादंबऱ्या लिहीतच होते. आणि संधी आणि वेळ सापडेल तेव्हा 'कलेसाठी कला का जीवनासाठी कला ?' या आपल्या आवडत्या वादाचा काथ्याकूट करीत होते. कादंबरीकार म्हणून त्यांच्या पायाखालची वाळू केव्हाच निघून गेली होती. आणि महाराष्ट्राने त्यांच्या बालिश टीकापद्धतीकडे केव्हाच दुर्लक्ष केलेले होते.

खांडेकर यांनी तर कादंबरीच्या क्षेत्रात फडक्यांइतकेदेखील नाव मिळविलेले नव्हते. त्यांचा पोरकट 'समाजवाद', हळवा 'मानवतावाद' आणि उठल्यासुटल्या कोटया करीत राहण्याचे विलक्षण वेड या गोष्टींशिवाय त्यांच्या कादंबरीत चौथे काहीही नव्हते. १९४५ ते १९५० हा काळ तर कादंबरीच्या क्षेत्रात दुष्काळाचाच काळ होता. मराठी 'नवकथा' तेव्हा जोरात होती. आणि कादंबरीची 'ही' उणीव अंशत: भरून काढण्याचे कार्य ती बजावीत होती.

अशा वेळी पेंडसे यांचा प्रवेश मोठ्या धूमधडाक्याने झाला. 'गारंबीचा बापू' ही त्यांची कादंबरी रसिकांनी आणि तेव्हाच्या टीकाकारांनी अक्षरश: डोक्यावर

# श्रेष्ठ कलाकृती

## लव्हाळी




घेतली. तिच्यातील अफाट बापूच्या रस-रशीत, जोमदार, धडाडीच्या आणि आदर्शवादी जीवनाकडे अवघा वाचक आकर्षित झालेला होता. या कादंबरीतले बापूच्या मानाने 'राधेचे' चित्रण तसे दुय्यमच होते. परंतु पेंडसे यांनी त्यामध्येदेखील विलक्षण रंग भरले होते. प्रा. गंगाधर गाडगीळ यांच्यासारख्या मार्मिक टीकाकाराने 'हर्णेचा दीपस्तंभ' या आपल्या लेखामध्ये पेंडशांच्या राधेविषयी उद्गार काढले होते. ते असे की, पेंडसे यांच्या राधेवर वाचकदेखील प्रेम करू लागले असतील; अर्थात त्यांचे नेमके वाक्य आज आठवत नाही, परंतु त्याचा भावार्थ हा होता. थोडक्यात म्हणजे पेंडसे यांनी कादंबरीकार म्हणून येथूनच प्रसिद्धी मिळविण्यास सुरुवात केली होती. 'गारंबीचा बापू'नंतर त्यांनी 'लव्हाळी'पर्यंत अनेक

कादंबऱ्या लिहिल्या. त्यांमध्ये फडके–खांडेकरांचे युग जसे त्यांनी निपटून काढले तसेच गो. नी. दांडेकरांनाही मागे सारले.

आजचा मराठीतील यशस्वी कादंबरीकार म्हणून पेंडसे यांचे नाव घेण्याशिवाय गत्यंतर नाही; परंतु असे असले तरी मला असे म्हणणे भाग आहे की पेंडसे यांनी कादंबरीकार म्हणून जे यश मिळविले त्यामध्येदेखील त्यांना फडके–खांडेकर यांची परंपरा मोडून काढता आलेली नव्हती ! येथे 'परंपरा' हा इंग्लिश शब्द 'School' या अर्थाने मी वापरीत आहे. हाच मुद्दा अधिक स्पष्ट करण्यासाठी 'घराणा' असा शब्ददेखील वापरता येईल. पेंडसे यांच्या कादंबरीची 'रथचक्र'पर्यंतची वाटचाल ही अधिक उज्ज्वल असली तरी ती जुन्या घराण्याशी आपले नाते सांगणारीच होती.

त्यांच्या 'लव्हाळी'ने मात्र या घराण्याशी आपले असलेले नाते पूर्णपणे तोडून टाकलेले आहे !

चि. त्र्यं. खानोलकर यांना आपल्या 'रात्र काळी घागर काळी' कादंबरीमध्ये जें करता आले नव्हते, परंतु गो. नी. दांडेकर यांनी आपल्या 'माचीवरला बुधा'मध्ये जे करून दाखविले होते ते अवघड काम 'लव्हाळी'मध्ये पेंडसे यांनी यशस्वीपणे केलेले आहे. जुन्या कादंबरीने ज्या काही परंपरा निर्माण केल्या होत्या, मानवी जीवनाच्या चित्रणाचे जे काही आडाखे अथवा ठोकताळे बांधून ठेवले होते, ठरीव ठशाच्या निवेदनाची चाकोरी पाडून ठेवलेली होती; त्या साऱ्या परंपरा, ते सारे ठोकताळे आणि चाकोऱ्या पेंडसे यांनी बऱ्याच प्रमाणात 'रथचक्र'मध्ये आणि संपूर्णपणे 'लव्हाळी'मध्ये पुसून टाकल्या. एका नव्याच दृष्टिकोनातून जीवनाचा आकृतिबंध उभा केला, या दृष्टीने 'लव्हाळी'चे यश कोणालाही हिरावून घेता येणार नाही हे अगोदरच स्पष्ट केले पाहिजे !

असे जरी असले आणि पेंडसे यांच्या 'लव्हाळी'मध्ये आशयाचे, निवेदनाचे आणि रूपाचे वेगळेपण दिसत असले तरी हा विकास हळू हळू होत आलेल्या त्यांच्या कादंबऱ्यांतून दिसून येतो. लेखक कालांतराने शिळा शिळा होत जातो आणि वाचकाच्या मनातील त्याच्या कलाकृतींविषयीची ओढ कमी कमी होत जाते; तसे काही पेंडसे यांच्या बाबतीत अजून घडले नाही. पेंडसे यांची प्रत्येक नवी कादंबरी नेहमीच उत्सुकतेचा विषय होऊन राहिलेली आहे. तेव्हा प्रश्न असा निर्माण होतो की ही उत्सुकता कोठून निर्माण होते ? त्याचे एक साधे उत्तर असे आहे की, कलावंतांच्या प्रतिभेत ताजेपणा, नवीन जीवनाचे दर्शन नवीन पद्धतीने घडविण्याचे सामर्थ्य आणि सौंदर्याचा साक्षात्कार घडविण्याचा त्याचा मगदूर अभिजात असला पाहिजे.

मला वाटते पेंडसे यांच्या प्रतिभेला या तिन्ही गोष्टींचे वरदान मिळालेले आहे. आणि त्या तिन्ही गोष्टींचा दिव्य साक्षात्कार आपल्याला त्यांच्या 'लव्हाळी'मध्ये घडतो.

—

## कादंबरीतला 'मी'

या कादंबरीत पेंडसे यांनी जी एक निवेदन–पद्धती स्वीकारलेली आहे, ती आत्मनिवेदनाच्या–म्हणजेच केवळ रोजनिशीच्या स्वरूपाची नसून आत्माविष्काराच्या स्वरूपाची आहे. ते असे की लव्हाळीतील 'मी' हा नुसते आत्मानुभव सांगत नाही तर त्यातूनच तो आत्माविष्कारही साधीत असतो. आपले जीवन कसकसे घडत गेले याचाच फक्त तो तारीखवार आणि घटनावार इतिहास सांगत नाही तर दुसऱ्याच्या जीवनाचेही गोफ स्वतःच्या जीवनाशी निगडीत करीत जातो. ही जीवने कुठे त्या 'मी'च्या जीवनाशी संवादी असतात तर कुठे ती विसंवादी असतात. यापेक्षाही महत्त्वाची तिसरी पद्धत पेंडसे यांनी इथे वापरली आहे; ती म्हणजे या कादंबरीत 'मी' बरोबरच अशीही जीवने येतात की ज्यांच्या या 'मी'च्या जीवनाशी प्रत्यक्ष काहीच संबंध नसतो, उदा० 'आज सोमवार ता. २१ ऑक्टोबर, विनोबांना अटक आणि ३ महिन्यांची शिक्षा.' किंवा 'जनरल वेव्हेल ह्यांची हिंदुस्थानचे कमांडर इन् चीफ् म्हणून नेमणूक.' असे कितीतरी उल्लेख आठवतात. हिटलर, मुसोलिनी किंवा सुभाषचंद्रांचा मृत्यू. या साऱ्या घटना आणि व्यक्तींचे तसे प्रत्यक्षतः या 'मी'शी कसलेही नाते नाही. तरी या 'मी'च्या सामान्य, फडतूस जीवनाचे आणखी सामान्यपण कोरले जाण्यास या व्यक्ती, घटना आणि ही सारी निवेदने कमालीची उपकारक ठरतात. इतकेच नव्हे तर या 'मी'च्या जीवनाविष्काराचा या घटना एक अविभाज्य भागच आहेत. असा संपन्न अनुभव कादंबरी वाचून संपविल्यावर आल्यावाचून राहत नाही. पेंडसे यांचे खरे यश हेच आहे असे म्हटले पाहिजे. एकीकडे या सामान्य माणसाची आणि त्याच्या इतक्याच इतर सामान्य परिवाराची जगण्यासाठी चाललेली धडपड आणि दुसरीकडे त्याच वेळी हिटलर–मुसोलिनी यांनी पेटविलेले अग्निकुंड यांमधील प्रखर विरोधाभास आणि या प्रचंड विरोधामधून पेंडसे यांनी जीवनाचे घडविलेले दर्शन विलक्षण तेजाळ आहे.

या रोजनिशीच्या माध्यमाचा उपयोग करून घेऊन पेंडसे यांनी कितीतरी बारीकसारीक घटनांतून, बारकाव्यातून मनुष्यस्वभावाचे विविध नमुने उभे केले आहेत. एक पिचलेली, उदासतेच्या छायेखाली झाकळून गेलेली, तरीपण जगण्यासाठी जिद्दीने आणि तितक्याच भल्याबुऱ्या मार्गाने जिवाची शर्थ करणारी माणसे पेंडसे यांनी मोठ्या समर्थपणे उभी केलेली आहेत. निवेदनाच्या तुकड्या-तुकड्यांतून असंख्य माणसांचे जे भव्य दर्शन पेंडसे आपल्या 'लव्हाळी'तून घडवितात एवढे भव्य आणि समग्र दर्शन आजपर्यंत एखाद्या कादंबरीतून क्वचितच घडले असेल !

लव्हाळीच्या यशाची बाजू अशी जेव्हा प्रकाशात येते तेव्हा अंधारात राहिलेल्या दुसऱ्या बाजूचीदेखील जाणीव झाल्याशिवाय राहत नाही. ती अशी की, शेवटी कलाकृती आणि तीही गंभीर कलाकृती आपला एक विशिष्ट खोल ठसा वाचकाच्या

मनावर उमटविल्यावाचून राहत नसते. 'लव्हाळी'तील 'मी' हा जरी शेवटी पूर्ण सुखात असल्याचे दाखवितो. रोज अडीच शेर दूध घेण्याची ऐपत आल्याचे सांगतो तरी त्या सुखातच दुःखाची एक बारीक कळ आहे. खरे तर असेच म्हणायला पाहिजे की 'मी'च्या साऱ्या दुःखद जीवनात सुखाची ही एक बारीक तिरीप आहे; परंतु पेंडसे यांनी निवेदनाची आणि आविष्काराची जी एक अभिनव पद्धत येथे स्वीकारली आहे, तिच्यातच यशाबरोबरच 'लव्हाळी'चे अपयशही लपलेले आहे. त्यामुळेच 'लव्हाळी' भेटल्याचा आनंद होतो, पण ती सोडून जाते तेव्हा चुटपुट लागत नाही. तरीही 'लव्हाळी'चे यश मोठेच !

**[ लव्हाळी : श्री. ना. पेंडसे : मौज प्रकाशन गृह,**
**मुंबई–४ : मूल्य १० रु. : पृष्ठे २९५ ]**

## ☐ चतुरस्त्र खेळाडूचा परिचय

नुकताच भारताचा दौरा करून गेलेला वेस्ट इंडीजचा संघ हा क्रिकेट क्षेत्रात आज जगज्जेता मानला जातो आणि या संघाचा नायक चतुरस्त्र 'सोबर्स' हा तर या खेळाच्या इतिहासातील सर्वश्रेष्ठ खेळाडू आहे, हे जाणकार कबूल करतात. तथापि वेस्ट इंडीजच्या या दैदीप्यमान यशाच्या मागे ज्या व्यक्तीचे परिश्रम आहेत, जिने हा संघ उभा केला त्या व्यक्तीचे नाव फ्रँक वॉरेल. (आता सर फ्रँक वॉरेल)!

क्रिकेटच्या खेळाचं वर्णन करताना It is the game of glorious uncertainty, असे केले जाते. जी गोष्ट खेळाची तीच क्रिकेटपटूंची. अनेक क्रिकेटपटूंनी मैदानावर भीमपराक्रम केले आणि कालांतराने लोक त्यांना विसरूनही गेले. 'डब्ल्यू जी' ग्रेस, रणजीतसिंहजी, ब्रॅडमन अशा काही थोड्याच खेळाडूंनी आपल्या क्रिकेटपटुत्वाच्या व व्यक्तित्वाच्या जोरावर आपली छाप जनमानसावर कायमची उठविली आहे. सर फ्रँक वॉरेलचेही नाव या खेळाडूंप्रमाणेच क्रिकेटमध्ये अमर झाले आहे. अशा या चतुरस्त्र खेळाडूचा परिचय श्री. वि. ग. कानिटकर यांनी आपल्या फ्रँक वॉरेल या पुस्तकात करून दिला आहे.

हे जरी फ्रँक वॉरेलचे चरित्र असले तरी कानिटकरांनी सर्वच घटना स्वतः फ्रँक वॉरेलच्या तोंडून ऐकविलेल्या आहेत आणि त्यामुळे या पुस्तकाला कोठेही रूक्षपणाचा स्पर्श होत नाही. उलट या पद्धतीमुळे वॉरेलच्या उमेदवारीच्या काळात घडलेल्या घटना अधिक हृदयस्पर्शी वाटतात. काळा खेळाडू कितीही श्रेष्ठ असला तरी त्याला कर्णधारपदाचा मान मिळू नये या वेस्ट इंडीजमधल्या विचित्र नियमाविरुद्ध बोलताना वॉरेलच्या मनाची होणारी तडफड लेखकाने अचूक टिपलेली आहे.

तथापि सर्वसामान्य वाचकांना या पुस्तकाचा उत्तरार्ध अधिक आवडेल यात शंका नाही; कारण येथे वॉरेल स्वतः त्याच्या कारकीर्दीतील महत्त्वाच्या सामन्यांचे समा-

लोचन करतो आणि काही काही वेळा हे वर्णन प्रत्यक्ष ऐकतो आहोत असे वाटावे इतक्या कौशल्याने केलेले आहे. अलीकडे वेस्ट इंडीज संघाने गाजविलेल्या बहुतेक सामन्यांचे वर्णन यात आलेले आहे आणि हा भाग वाचताना वारंवार पुनः प्रत्ययाचा आनंद वाचकाला मिळतो; अर्थात् सर्वच सामन्यांना यात न्याय मिळाला आहे अशातला भाग नाही. तथापि, काही मर्यादांमुळे लेखकाला आपला हात आखडता घ्यावा लागला असणे शक्य आहे. चरित्रनायक वॉरेल याच्या क्रिकेट-जीवनातील अनेक छायाचित्रे पुस्तकाचे सौंदर्य अधिक वाढवितात.

हे पुस्तक वाचल्यानंतर आणखी असा विचार मनात येतो की, हा परकीय खेळ आपण आपला केला. सहस्रावधी लोक आतुरतेने हा खेळ पाहतात, लक्षावधी लोक रेडिओवर निव्वळ वर्णन ऐकून आपले समाधान करून घेतात; पण या खेळावर अशी चांगली पुस्तके मराठीत का लिहिली जाऊ नयेत ? अशा महत्त्वाच्या खेळाडूंच्या जीवनाचा परिचय करून देणाऱ्या सामन्यांची रोचक वर्णने करणाऱ्या पुस्तकांचे मराठी वाचक सहर्ष स्वागत करतील. श्री. कानिटकरांचे या खेळावरील प्रेम व ज्या प्रसन्न शैलीने त्यांनी हे पुस्तक लिहिले आहे ती पाहता वाचकांनी त्यांच्याकडून अशी अपेक्षा बाळगल्यास ती चूक ठरू नये. ●

—प्रा. एस्. आर्. रायकर

[ फ्रँक वॉरेल : ले. वि. ग. कानिटकर : इनामदार बंधू प्रकाशन : पृष्ठे ७८ : किंमत दोन रुपये पन्नास पैसे ]


लाल महाल प्रतापगड पन्हाळगड
राजगड पुरंदर आग्रा
मुजऱ्याचे मानकरी

लेखक : ब. मो. पुरंदरे : मूल्य प्रत्येकी दोन रुपये

राजहंस प्रकाशन, ४१९ नारायण पेठ, पुणे २

# भिंतीच्या तुंबड्या

सुधाकर राजे

## □ समृद्धीची लांबी-रुंदी

जो सोपी गोष्ट कठीण करून सांगतो तो तज्ज्ञ, अशी एक व्याख्या आहे. अशाच एका अमेरिकन तज्ज्ञाने आधुनिक फॅशनेबल बायकांच्या 'मिनिस्कर्ट' नामक तोकड्या झग्यांची विद्वत्ताप्रचुर सामाजिक कार्यकारणमीमांसा करताना असा गहन सिद्धांत मांडला आहे की, झग्याची उंची ही त्या त्या काळच्या सामाजिक समृद्धीवर अवलंबून असते. उदाहरणार्थ, विसाव्या शतकाच्या प्रारंभी गरीब व्हिक्टोरियन युगातले झगे पायघोळ होते. १९२० च्या सुबत्तेच्या काळात ते वर चढले. १९३० च्या सुमारास अमेरिकेची अर्थव्यवस्था एकदम कोलमडली तेव्हा ते पुन: पायघोळ झाले व आताच्या समृद्ध काळात ते सारखे वरवरच चढत आहेत. आता बोला! शिंप्याच्या टेपवर समृद्धीची लांबी-रुंदी मोजण्याचा हा सिद्धांत वीतभर लंगोटी लावून तत्त्वचिंतन करणाऱ्या कुठल्या हिंदुस्थानी तत्त्वज्ञाला स्फुरला असता ? मला आपले वाटले होते की बायकोची फॅशन ही नवऱ्याच्या पाकिटावर अवलंबून असते. पण तसे नाही महाराजा! सबंध देशाच्या आर्थिक परिस्थितीचा तो एकमेव निर्देशांक आहे. आता सुबत्ता जेवढी जास्त तेवढे अंगावर कपडे कमी असा एकदा हिशेब लावला की आजकाल पाश्चिमात्य देशांत माजलेले 'टॉपलेस' कपडे समृद्धीच्या बाबतीत टॉप समजावे लागतील—नाही, टॉपच्या एकच पायरी खाली. अगदी टॉपची पायरी कोठली ?— बॉटमलेस!

## □ राजपुत्रासारखा राजकुत्रा

मराठी वर्तमानपत्रांतून गाई-वासरांच्या बातम्या वरचेवर येत असतात. अर्थात् त्या वासराने चार डोळ्यांचा किंवा दोन डोळ्यांचा काही तरी डोकेबाज चमत्कार करून दाखविलेला असतो; पण इंग्लंडात समर्थाघरच्या श्वानाला वर्तमानपत्रांत प्रसिद्धी मिळविण्यासाठी असे काही सुरस चमत्कारिक पण अनावश्यक करावे लागत नाही. थोड्याच दिवसांपूर्वी इंग्लंडच्या एका प्रमुख वर्तमानपत्रांत पहिल्याच पानावर बातमी झळकली—राजकन्या मार्गारेट हिचा कुत्रा खुशाल आहे. आता तुम्ही म्हणाल, कुत्र्याच्या खुशालीत बातमी ती काय? पण चुकता तुम्ही इंग्लंडात जरी पंतप्रधान असला तरी राजघराणे म्हटले की देशाची जबाबदारी आलीच. तेव्हा राजघराणातल्या या कुत्र्याला हल्लीच्या कठीण परिस्थितीतही आपली तब्येत सांभाळता येते हेच नवल नाही का? आणि परिस्थिती बिकट आहे हे कोणीही कबूल

करील! एकीकडे ब्रिटनला कॉमन मार्केटमध्ये प्रवेश मिळू नये म्हणून द् गॉलची मनी-मांजर भगीरथ प्रयत्न करीत आहे. दुसरीकडे व्हिएटनाममधील अमेरिकन धोरणाला ब्रिटनचा अधिक जोरदार पाठिंबा मिळत नाही म्हणून प्रेसिडेंट जॉन्सनचा बोका गुरगुरत आहे. आणि आता याच्या जोडीला घरातल्या घरात विल्सन साहेबांच्या ताटाखालची मजूरपक्षीय मांजरे अचानक मिशा फेंदारून 'फिस्' करू लागली आहेत. एवढ्या सगळ्या कटकटीने राजपुत्रासारखा राजकुत्रादेखील टेकीला यायचा. तेव्हा मार्गारेटचा कुत्रा खुशाल आहे ही निश्चितच महत्त्वाची बातमी आहे.


## □ निवडणुकीच्या पोरखेळात पोरांचे स्थान

"फक्त प्रौढांसाठी" अशा ज्या गोष्टी आहेत त्यात चहा व जरा गरमागरम चित्रपट याच्या जोडीला निवडणुकादेखील येतात. खरे म्हणजे या गेल्या निवडणुकीत इतकी मौज आली की निवडणूक हा खेळ "फक्त मुलांसाठी" असायला हवा. राजस्थानात एका आदिवासी मतदार कुटुंबाने मतदान करताना निवडणूक अधिकाऱ्याला म्हटले, "आमच्या मुलांनाही मतदान करू द्या." पण ही गोष्ट कायद्यात बसणार नाही, असे त्यांना सांगण्यात आले तेव्हा आश्चर्याने स्तंभित होऊन ते म्हणाले, "काय, या तमाशात मुलांनी भाग घ्यायला काय हरकत आहे ?" बरोबर आहे. खरे म्हणजे कुठल्याही पोरखेळात पोरांना पहिले स्थान पाहिजे. निवडणुकीसारख्या जमाडी जमतीत तर मोठ्या माणसांचे काहीच काम नाही–अन् खऱ्याखुऱ्या मोठ्या माणसांना हे माहीतही आहे. उदाहरणार्थ आपले राष्ट्रपती. त्यांनी म्हणे कधीच मतदान केलेले नाही. पंजाब न्यायालयाच्या सर्व न्यायधीशांनीही मतदान न करण्याची प्रथा चालू ठेवली आहे, असे वर्तमानपत्रात वाचले. का ?– त्यांना माहीत आहे की, लहानांच्या खेळात मोठ्यांनी लुडबूड करू नये म्हणून.

## □ पासष्टावी कला : बायको–नियंत्रण

"बायका–नियंत्रणाची कला" या नावाचे एक पुस्तक इंग्रजीत नुकतेच प्रसिद्ध झाले आहे असे समजल्यापासून मी जीव तोडून (पण गुपचुप) ते मिळविण्याची खटपट करीत आहे. ही पासष्टावी कला ज्याला साधली तो मूषकाचा माणूस झाला असे समजावे. दुर्दैवाने गुपचुप बरीच चौकशी करूनही पुस्तक अजून माझ्या हाती लागलेले नाही, पण त्यातले काही परिच्छेद वर्तमानपत्रांत उद्धृत झालेले पाहिले. त्यावरून असे दिसते की इतर हिंस्र श्वापदांप्रमाणेच बायकोला देखील माणसाळता येणे शक्य आहे. पण ते कोणाला ? ज्याने सर्कशीत रिंगमास्टरचे काम केले असेल त्याला. जो पिंजऱ्यात जाऊन सिंहाच्या समोर उभा राहू शकतो तो धोक्याची आणखी एक पायरी चढून व आणखी थोडासा धीर एकवटून स्वयंपाकघरात जाऊन बायकोसमोरदेखील उभा राहू शकेल.–पण माझ्यासारख्या येरागबाळ्याचे ते काम नोहे.

# तुमचे भविष्य आमचा अंदाज



**श्री. गो. जोशी**
**सायनाचार्य, नासिक**
**ता. ८ ते १४ एप्रिल १९६७**

**मेष** : व्ययस्थानी अनेक ग्रह आणि मंगळही विरोधी. अशी ग्रहस्थिती असताना तुम्हा मेषराशी व्यक्तींबद्दल आशादायक असे मी काय लिहू शकणार? पण एवढे निश्चित लिहू शकेन की, अशा वेळीच तुमच्यातील जिद्द जागी होईल, निर्धार पेटून उठेल. तुमचे यशापयश हे ग्रहांच्या इष्टानिष्टतेवर अवलंबून नाहीच मुळी !

वाढत्या खर्चाला रोखण्याचा प्रयत्न करा. विरोधकांशी—वरिष्ठांशी वागताना नम्रता—लीनता धारण करा. तुमच्यासारख्या ताठ मनोवृत्तीच्या माणसांना असं वागा म्हणून सांगणंही योग्य नाही. पण हा एक प्रयोग आहे. या वेळी करून पाहिलात तर त्याचे फल हातोहात मिळेल.

दि. १० ते १२ थोडचाफार अनुकूल काल.

**वृषभ** : कित्येक महिन्यांनंतर या वेळचा अनुकूल ग्रहस्थितीचा पर्वकाल तुमच्या वाटचास येत आहे. याच पर्वकालात आजवरचे सारे यशापयशाच्या पापाचे परिमार्जन घडेल. चारित्र्याला नवी झळाळी लाभेल. उत्तुंग यशापासून आजवर आपण दुरावला होतात, ते आता सहजासहजी मिळेल.

वक्री मंगळाची खंत न बाळगता ठामपणे उभे राहिलात तर कधी

कुणाला न मिळालेले यश तुमच्या पदरी पडेल. स्थावराचे सारे प्रश्न सुटतील, विरोधक मागील दाराने पसार होतील.

दि. ८ ते ११ या कालात चिरंतन स्मृतीच्या घटना घडाव्यात.

**मिथुन** : आपल्या कार्यस्थानी रवी-शनी-बुध हे त्रिकुट जमलेले आहे आणि त्या सर्वांचा गुरुशी त्रिकोणयोग घडत आहे. एवढी चांगली ग्रहस्थिती कित्येक दिवसांनी तुम्हांला लाभलेली आहे. त्याच्याकडून काय हवं ते मागून घ्या. ते प्रसन्न मनाने म्हणतील, " वरं ब्रूहि. " व्यावसायिक व सांसारिक बहुतेक साऱ्या अपेक्षा या वेळी सफल व्हाव्यात. अधिकाराचे स्थान विशेष परिश्रम न करताही लाभेल. धनोत्पादनाचे अनेक मार्ग दृष्टिक्षेपात यायला लागतील. तुमच्या भव्य योजना यशस्वी व्हाव्यात म्हणून अनेकांच्या मदतीचे हात पुढे होतील.

दि. १० ते १३ या कालाचे महत्त्व विशेष जाणवेल.

**कर्क** : सूर्य–शनी आपल्या भाग्यस्थानातून जात असल्यामुळे चौथ्या मंगळाच्या अनिष्टतेची धार बोथट बनेल. त्याच्या कारवाया त्याच्या अंगाशी यायला लागतील.

तरीसुद्धा हे दिवस पूर्णांशाने स्वास्थ्याचे नव्हेतच. मोठ्या शिकस्तीच्या परिश्रमाने यशाचा काही भाग पदरी पाडून घ्याल एवढेच.

वैचारिक संघर्ष मिटायला लागतील. दूरचे स्थलांतर स्थानांतर घडून आल्याने, जुने, दूषित वातावरण जाऊन नवे प्रसन्न वातावरण दिसू लागेल. चार पैसे हाती येतील, अनारोग्य दूर होईल, रेंगाळलेली कामे गती घेऊ लागतील.

**सिंह** : आठव्या शनीच्या जोडीला सूर्यही आलेला आहे; आणि याच वेळी वक्री मंगळाने आपल्या पवित्रा बदललेला आहे.

आपल्या प्रगतीचा वेग मंदावल्यासारखा जाणवेल, व्यवसाय क्षेत्रात मतभेदांची वावटळे उठतील की काय अशी भीती वाटायला लागेल आणि आरोग्य म्हणावे तसे ठीक नाही, अशी जाणीव व्हायला लागेल.

म्हणून मला असे सांगावेसे वाटते की, या वेळी आततायीपणाने कोणतीही गोष्ट न करता ती १० वेळा विचार करून करा. फार मोठ्या जबाबदाऱ्या उचलू नका आणि विरोधकांशी जरा पडते घेऊनच वागा. काही वेळा माघार घेणेही हिताचे असते.

दि. १० ते १३ प्रवास, बदल, स्थानांतर असे घडावे.

**कन्या** : तुमच्या राशीसमोरच रवि–शनी उभे आहेत तर मंगळ वक्र गतीने तुमच्या राशीकडे यायला निघालेला आहे. या चमत्कारिक ग्रहस्थितीचा तुमच्या

मनावर–प्रकृतीवर आणि पैशाअडक्यावरही अनिष्ट परिणाम झाल्याशिवाय कसा राहील ?

एकटा अकरावा गुरू फार झाले तर एवढे करील की, ही अनिष्टता फार काल टिकू नये म्हणून सतत प्रयत्नशील राहील.

कौटुंबिक क्लेश आणि कलह वाढू लागतील, सहकारी, नोकर-चाकर असहकार पुकारतील, वाहने कोणत्याही क्षणी रुसून बसतील.

लोकांना तोंडभरून आश्वासने देण्याच्या भानगडीत पडू नका, दीर्घ मुदतीचे करारमदार तर मुळीच करू नका.

दि. १३–१४ पासून काहीसे अनुकूल वातावरण दिसायला लागेल.

**तूळ :** फक्त या एप्रिलच्या पहिल्या पंधरवड्यापर्यंतच आपणांस जपून पावले टाकावयास हवीत. दुसऱ्या पंधरवड्यात त्याची सर्व भरपाई होईल.

अनारोग्य, अस्वास्थ्य आणि नोकराचाकरांचा व सहकाऱ्यांचा विरोध हेच या आठवड्याचे स्वरूप. फार मोठ्या जबाबदाऱ्या उचलण्यापूर्वी १० वेळा विचार करा. भावनेला बळी पडण्याचा हा काल नव्हे.

वाहने कोणत्याही क्षणी हटून बसतील, सांपत्तिक अडचणींना प्रत्यही तोंड द्यावे लागेल, आजवर कधी जाणवल्या नसतील अशा अनारोग्याच्या तक्रारी या वेळी जाणवायला लागतील. तसे काही प्रतिष्ठेवर आघात होण्यासारखे काही घडणार नाही. पण मात्र सतत सावध राहायला हवे.

दि. ८ ते १० काहीसा अनुकूल काल.

**वृश्चिक :** या वेळचे ग्रहमान तसे वाईट नाही; पण अपेक्षेप्रमाणे अनुकूलही नाही. प्रत्येक गोष्टीला कमालीचा विरोध जाणवेल. सहजासहजी घवघवीत यश लाभावे, अशी अपेक्षा या वेळी करताच येणार नाही.

भाग्यस्थ गुरूच्या रूपाने परमेश्वर आपल्या पाठीशी सतत उभा आहे एवढेच एक मनाला समाधान. या वेळी तीव्र मतभेदामुळे चांगले मित्र व सहकाऱ्यांची सहानुभूती गमावून बसाल. भरंवशाची माणसे ऐनवेळी दगा देतील आणि त्यामुळेच आपले सारे व्यवहार अडून बसतील. आव्हान देणे तर टाळाच. आवाहन करणेही परिणामी हिताचे ठरणार नाही.

दि. १२ ते १४ या काळी काही कामे गती घेऊ लागतील.

**धनू :** शनीच्या जोडीला सूर्यही चौथा. यामुळे सध्याचे दिवस एकंदरीत स्वास्थ्याचे व प्रगतीचे नाहीत, असे मला आपणांस स्पष्ट सांगण्याशिवाय गत्यंतर नाही. अपेक्षाभंग, तेजोभंग, अवहेलना असले काही प्रकार सतत अनुभवावे लागतील.

प्रकृती आणि पैसा या दोन्हीवरही आघात व्हायला लागतील. सारी कामे गतिहीन बनतील, आणि मनामध्ये विचारांचे वादळ उठेल.

मंगलकार्याचे पुढे ढकलावे लागेल, थोरांची सहानुभूती लाभणे अवघड जाईल• व्यवसाय-क्षेत्रातही काही बदल घडवून आणणे इष्ट ठरणार नाही.

दि. ११ ते १३ थोडेफार यश पदरी पडावे.

**मकर** : आधीच अनुकूल असलेल्या ग्रहस्थितीवर या वेळचे समर्थ पराक्रमस्थ ग्रह मानाचा तुरा खोवतील. शिक्षणक्षेत्रात, कलाक्रीडाक्षेत्रातही विक्रमी यश मिळवाल. या आठवड्यात दूरचे प्रवास अनेक वेळा घडतील. मिळणारे नवे वातावरण प्रसन्न व उत्साही दिसू लागेल. आपले कर्तृत्व या वेळी अधिक धारदार बनेल. न होणारी कामेही झटपट यश घेऊ लागतील, वैचारिक मतभेद मिटतील, सांसारिक समस्या सुटायला लागतील. एकंदरीत हे दिवस आपणांस चिरंतन स्मृतीचे ठरावेत.

दि. १२ ते १४ या कालाचे महत्त्व अधिक जाणवेल.

**कुंभ** : अनेक उग्र ग्रहांनी धनस्थानी सध्या तळ ठोकला आहे. ते आपणांस अनुकूल तर ठरणार नाहीतच, उलट सर्वतोपरी त्रास द्यायला लागतील. सांपत्तिक बाजू बरीच निराशाजनक बनेल. शिवाय घसा, दंत-नेत्र विकार वाढू लागल्यामुळे मन फारच अस्वस्थ बनेल.

पण ही अवस्था फार काळ टिकणार नाही. सूर्याचे पराक्रम स्थानी आगमन घडताच हरवलेले स्वास्थ्य निश्चित गवसेल. साऱ्या विवंचना मिटून जातील. दि. १४-१५ पर्यंत मात्र फारच जपून आणि सावधपणे वागायला हवे. 'अशुभस्य काल हरणं' हाच याच्यावर तोडगा.

दि. १० ते १२ थोडेफार यश लाभेल.

**मीन** : सध्या तुमचा अनिष्ट काल अगदी शिगेला पोचला आहे. कसेही वागा, काहीही करा, स्वास्थ्य लाभत नाही. अपेक्षित यशही मिळू शकत नाही. फक्त आणखी ८-१५ दिवसच आपणांस अशा अवस्थेत काढावे लागतील. तोपर्यंत मन मारून काम करावे लागेल, अनेकांचे खोटेनाटे आरोप सहन करून मूग गिळून स्वस्थ बसावे लागेल. साडेसातीत असे तडाखे कधीकधी बसतातच. 'क्षमा वीरस्य भूषणम्' हे तत्त्व अंगी बाणवून वागायला शिका.

मुख्यतः या वेळी प्रकृती-मन:स्थितीवर आघात व्हायला लागतील. वरिष्ठांचा जाच-छळ सहन करावा लागेल. तुमच्या कसोटीची वेळ हीच आहे.

दि. ११ ते १३ या काळी थोडेफार अपेक्षेप्रमाणे घडावे. •

# उर्दू वार्ता

संकलन : हिदायतखान

## ☐ जागृत मुस्लिम

नुकत्याच पार पडलेल्या सार्वत्रिक निवडणुकीत अनेक 'चमत्कार' घडले! अनिमिषिक्त राजाप्रमाणे सतत १९ वर्षे राज्य करणाऱ्या काँग्रेसचा अनेक राज्यांत पराभव झाला. काँग्रेसचे अनेक रथीमहारथी तोंडघशी पडले! त्याचप्रमाणे भारतातील दुर्मुखलेला, वाळीत पडल्याप्रमाणे वागणारा मुस्लिम-समाजही खडबडून जागा झाला.

गेल्या तीन सार्वत्रिक निवडणुकांमध्ये मुस्लिमांची मते हमखास काँग्रेसला मिळत होती. काँग्रेसशिवाय आपला कोणी त्राता नाही, अशी भारतीय मुस्लिमांची भावना होती; परंतु या चौथ्या निवडणुकीत 'मजलिसे मुशावरत'ने काही अंशांनी तरी का होईना, त्यांच्यांत राजकीय जागृती निर्माण केली. त्यांच्या परंपरागत राजकीय विचारसरणीला नवी कलाटणी दिली. त्यासाठी उत्तर प्रदेशात जनसंघाशीदेखील संघान बांधले!

सहा कोटींहून अधिक लोकसंख्या असलेल्या ह्या समाजात असा एक न्यूनगंड होता की, भारतीय राजकारणात आपल्याला काही स्थान नाही, मान नाही! परंतु मुशावरतने यंदाच्या निवडणुकीत जी धावपळ व प्रचार केला त्यामुळे हा न्यूनगंड अंशत: तरी दूर झालेला आहे. आपल्या सामर्थ्याची जाणीव या समाजाला झाली आहे. यापुढे काँग्रेस वा अन्य कोठल्याही पक्षाला त्यांच्याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही.

परंतु मुशावरतने आपले हे कार्य निवडणुकीपुरतेच मर्यादित ठेवू नये. कारण प्रत्यक्ष सरकारपेक्षा मुस्लिमांचा संबंध समाजाशी नित्याचा आहे. तेव्हा भारतातील अन्य जनतेशी समरस होऊन देशोद्धाराच्या कार्यात अहमहमिकेने तेही सामील होतील, असे काही विधायक कार्य मुशावरतने हाती घ्यावयास हवे! इस्लामच्या शिकवणीचे गमक ओळखून तिचे उदात्तीकरण करण्याचे महत्त्वाचे कर्तव्य मुशावरतने पार पाडावयास पाहिजे. 'दावत' (दिल्ली) १०-३-६७

## □ बक्र-ईदचा बोध :

बक्र-ईद ही मुस्लिमांची दुसरी महत्त्वाची ईद. रमझान ईदप्रमाणेच याही ईदच्या दिवशी सर्व मुस्लिम बांधव एकत्र येऊन नमाज पढतात; परंतु ही नमाज रमझानपेक्षा फार लौकर म्हणजे सकाळी नवाच्या आत व्हावी लागते; कारण नमाज होताच बकऱ्यांची कुर्बानी देऊन शक्यतो लौकर घरोघरी 'प्रसाद' वाटणे जरूर असते. यासंबंधी एक मनोरंजक आख्यायिकाही प्रचलित आहे, ती अशी : ही नमाज होईपर्यंत वनातल्या हरिणी दोन पायांवर उभ्या राहतात. स्वत: काही खात नाहीत व आपल्या पाडसांनाही दूध पाजीत नाहीत !

परमेश्वराचे प्रषित—पैगंबर इब्राहिम अलेह्-सलाम यांना दृष्टान्त होतो की, तुम्हांला सर्वांत प्रिय असलेली वस्तू मला अर्पण करा ! त्याप्रमाणे आपल्या परमप्रिय पुत्राचा ते वध करण्यास शस्त्र उगारतात. पण शस्त्र चालतच नाही ! शस्त्र बोलते : 'परमेश्वराच्या आदेशाप्रमाणं मी हे कृत्य करू शकत नाही !' परंतु तरीही इब्राहिम सुरी चालवतातच ! शेवटी, सुरी आपलं काम करते ! इब्राहिम डोळ्यांवरील पट्टी काढून पाहतात तो रक्ताच्या थारोळ्यात मेंढराचं मुंडकं धडावेगळं झालेलं आढळतं ! ते चमकून इकडे तिकडे पाहतात तो त्यांचा पुत्र दुसरीकडे पडलेला असतो !...

परमेश्वरावरील निष्ठेची ही कठीण परीक्षा इब्राहिम अलेह्-सलाम तर उत्तम तऱ्हेने पास झाले होते; परंतु त्यांचे वंशज म्हणविणारे व त्यांच्या स्मृत्यर्थ बक्र-ईद साजरी करणाऱ्या आम्हा मुस्लिमांना निष्ठेची कितपत चाड आहे ?

दैनंदिन जीवनात, अंगीकृत कार्यावर आमची कितपत निष्ठा असते ? हस्तांदोलन, आलिंगन म्हणजे खरे मीलन नव्हे व तो बक्र-ईदचा उद्देशही नव्हे ! तसेच आम्ही कुर्बानीचा प्रसाद कोणाला वाटतो ? आमच्यासारख्याच चार पांढरपेशा सुहृदांना ! गरीब, गरजू मात्र उपाशीपोटीच राहतात ! त्यांची आम्हांला आठवणही होत नाही !

भौतिकवादाच्या कैफात आध्यात्माची मातब्बरीच आम्हांला वाटेनाशी झाली आहे ! मग आमच्या ईद साजरी करण्यात पूर्वीची निष्ठा कुठून असणार ?

पैगंबर इब्राहिमप्रमाणं सर्वस्व अर्पण करण्याची धमक आमच्यात कुठून येणार ? ईदच्या निमित्ताने त्या निरपेक्ष, निस्सीम निष्ठेची आठवण झाली, त्या स्फूर्तिदायी इतिहासाच्या स्मृतीनं आम्ही क्षणभर अंतर्मुख बनलो, तरी बक्र-ईदचा खरा उद्देश सफल होऊ शकेल !

'उर्दू टाइम्स' (२२–३–६७) ●

# लोकमान्य आणि राजमान्य

# फ्रँक वॉरेल

देवाला चांगल्या माणसांची उणीव फारच प्रकर्षानं भासू लागली आहे, असं एक एक मृत्यूची बातमी वाचली की वाटू लागतं आणि ही उणीव भरून काढण्यासाठी एखाद्या नीतिमत्तेची चाड नसलेल्या उद्योगपतीप्रमाणे दुसरीकडची चांगली माणसं खेचून आणण्याचंही त्याला काही वाटेनासं झालंय. आतापर्यंत केनेडी, शास्त्री, बर्वे यांना नेऊन त्याने आपले लक्ष फक्त राजकीय क्षेत्रातच आहे, असं दाखविण्याचा प्रयत्न केला होता. आता फ्रँक वॉरेलला नेऊन त्याने आपली नजर क्रीडाक्षेत्राकडेही वळवली आहे! यात फरक एवढाच की केनेडी, शास्त्री, बर्वे यांना लोकांच्या मनात निर्माण केलेल्या अपेक्षांची पूर्ती करण्याची संधीही देवाने दिली नाही तर वॉरेलनं मात्र त्याच्या क्षेत्रात जे काही करता येणं शक्य आहे ते करून दाखविलं. आता करण्यासारखं फारसं काही शिल्लक राहिलं नाही, असं वाटलं तेव्हा तृप्त मनानं 'आता सांगेन गोष्टी युक्तीच्या चार' असं म्हणत तो निवृत्त झाला आणि मगच काळानं आपली निर्घृण नजर त्याच्याकडे वळवली असं असलं तरी क्रिकेटच्या कल्याणासाठी, उन्नतीसाठी वॉरेल अजून कितीतरी दिवस हवा होता. या खेळात चैतन्य आणण्यासाठी एम्. सी. सी. ला अनेक नियम बदलून, ब्राईट क्रिकेटची कित्येक प्रलोभनं प्रेक्षकांना दाखवून जे दहा वर्षांत करता आलं नाही तेच वॉरेलच्या नेतृत्वाखाली १९६१ साली ऑस्ट्रेलियाला गेलेल्या वेस्ट इंडीज संघानं केवळ चार महिन्यांच्या अवधीत एखाद्या चमत्काराप्रमाणं घडवून आणलं. पाच-पाच दिवस शांतपणे खेळला जाणारा हा संस्थानी खेळ हळूहळू इतिहासजमा होणार काय, असं इंग्लंड ऑस्ट्रेलियातल्या लोकांना वाटू लागलं असतानाच वॉरेलन स्वतःच्या आणि आपल्या संघाच्या कर्तृत्वानं आणि या खेळाकडे पाहण्याचा आपल्या वृत्तीनं या खेळाला आणि त्याबाबत होऊ पाहणाऱ्या लोकांच्या निराशाजनक प्रवृत्तीला एक वेगळं आणि चांगलं वळण लावलं. सबंध ऑस्ट्रेलिया परत एकदा क्रिकेटवेडी बनविली. वॉरेलची क्रिकेटमधली इतर सगळी कर्तबगारी विसरली तरी केवळ या एका दौऱ्यातील त्याच्या कामगिरीसाठी क्रिकेटच्या इतिहासात एक सोन्याचं पान राखून ठेवावं लागेल.



## वॉरेल – एक थोर कर्णधार

अनेक चांगले खेळाडू एका वेळी संघात असूनही वेस्ट इंडियन संघ त्यांचेकडून अपेक्षित असलेलं यश कधीही मिळवू शकला नव्हता. वॉरेलनं कर्णधारपदाची सूत्रं हाती घेताच ही परिस्थिती बदलली. सुसंस्कृत वॉरेलनं आपल्यापुढील बिकट कार्याला तोंड द्यायला अतिशय शांतपणे आणि आत्मविश्वासाने सुरुवात केली. गुणी पण निरनिराळ्या स्वभावांच्या वेस्ट इंडियन खेळाडूंना एकत्र आणून त्यांना एक-संघ बनवणं हे त्याचं पहिलं उद्दिष्ट होतं. प्रतिकूल परिस्थितीला वेस्ट इंडियन खेळाडू निश्चयाने तोंड देऊ शकत नाहीत, असा समज त्यांचेबद्दल सगळीकडे प्रसृत झाला होता. वॉरेलनं त्यांना डोकं शांत ठेवून संकटाला तोंड कसं द्यायचं हे शिकवलं. पूर्वीचे वेस्ट इंडियन संघ संकटकाळी नेस्तनाबूद होत तर हा वॉरेलच्या नेतृत्वा-खालील संघ संकटातून नवी शक्ती, नवी प्रेरणा, नवे कौशल्य संपादन करत असे. याचं उदाहरण म्हणजे प्रख्यात ब्रिस्बेन 'टाय' टेस्ट. ज्या वेळी पराभव अगदी अटळ दिसत होता, त्या वेळी या संघाने सामना अनिर्णित ठेवण्याचा प्रयत्न न

करता नेत्रदीपक क्षेत्ररक्षणानं, एका विलक्षण तऱ्हेनं त्याचं रूपांतर क्रिकेटच्या इतिहासातील पहिल्या 'टाय' मध्ये केलं. याच सामन्यातील शेवटचा चेंडू हॉल टाकत असताना "आता फक्त 'नो बॉल' टाकू नकोस" ही त्याने केलेली सूचना त्याच्या कर्णधारपदाचा एक पैलू दाखविते. जॉनी मॉइस म्हणतो, "वॉरेलनं या दौऱ्यात आपलं कर्णधारपद फारच चांगल्या रीतीनं सांभाळलं. मैदानाबाहेरून खेळ पाहताना वॉरेल कर्णधार म्हणून मैदानावर प्रभाव पाडण्याचा प्रयत्न करत आहे. असं तुम्हांला कधीच वाटलं नसतं. स्वतःच्या उत्कृष्ट फलंदाजीने इतरांसमोर त्याने एक चांगला आदर्श ठेवला. १९६१ च्या ऑस्ट्रेलियन दौऱ्याप्रमाणेच १९६३ चा इंग्लंडचा दौरा वॉरेलचा दौरा म्हणूनच गाजला. ऑस्ट्रेलियाला 'अॅशेश' परत मिळवून देणारा कर्णधार रिची बेनो म्हणतो, "१९६२ चा दौरा हा वॉरेलचा दौरा म्हणूनच गणला गेला पाहिजे. सोबर्स, हंट, कन्हाय, हॉल, गिब्ज यांसारखे बडेबडे खेळाडू या संघात होते आणि तरीही हा वॉरेलचाच दौरा होता. तो फलंदाजी आणि क्षेत्ररक्षणात विशेष चमक दाखवू शकला नाही तरीही तो जर या संघाचा कर्णधार नसता तर वेस्ट इंडियन संघ जास्तीत जास्त म्हणजे ही कसोटी–मालिका अनिर्णित ठेवू शकला असता." एका कर्णधाराचा त्याच्या संघावरील प्रभावाचा दुसऱ्या एक महान कर्णधाराकडून केवढा हा गौरव !

वेस्ट इंडियन खेळाडूंच्या मनात वॉरेलनं जे स्थान मिळविलं होतं, त्याला खरोखर तोडच नाही. फ्रॅंकी हे त्यांचं दैवत होतं. फ्रॅंकीबद्दल त्यांना काय वाटत होतं हे त्यांच्याच शब्दांत वाचणं मोठं उदबोधक आहे. गिलख्रिस्ट हा उसळत्या रक्ताचा आणि भडक डोक्याचा द्रुतगती गोलदाज वॉरेलबद्दल काय म्हणतो पाहा. "एकदा फ्रॅंक वॉरेल नावाचा एक मनुष्य होता आणि प्रत्येकाचा तो आवडता होता. ते त्याला शैलीदार फलंदाज म्हणत, तसंच 'फादर' असंही म्हणत; कारण छोटया लुकलुकत्या डोळ्यांच्या मुलांना तो वडिलांप्रमाणे होता.' आणि छोटी मुलं पुढं ज्या वेळी त्याच्या बाजूने खेळू लागली त्या वेळी अशा निश्चयानेच की, या माणसाचा मी कधीच अपेक्षाभंग करता कामा नये. इतर सर्वांप्रमाणेच मीसुद्धा त्याच्यासाठी क्रिकेटच्या मैदानावर आपलं सर्वस्व अर्पायला नेहमीच तयार असे. हा एक असा मनुष्य आहे की, त्यानं आमच्यात खेळण्याची आणि जिंकण्याची जिद्द निर्माण केली आणि त्या काळी वेस्ट इंडियन संघाला सगळ्यात कशाची जरूरी असेल तर जिद्दीचीच. इंग्लंडविरुद्ध जेव्हा वॉरेल आपली १९१ धावांची प्रदीर्घ इनिंग खेळला, त्या वेळी, इतर वेळी पत्थराचे काळीज असलेले खेळाडू, आपण त्याच्यासाठी दुसरी बाजू रोखून धरू शकलो नाही आणि त्याचा विश्वासघात केला या भावनेनं अक्षरशः रडलेले मी पाहिले आहेत." गिलख्रिस्टचा एके काळचा जोडीदार वेस हॉल यालाही वॉरेलबद्दल नितांत आदर आहे. तो म्हणतो, "वॉरेल संघनायक होण्यापूर्वी वेस्ट इंडियन संघातील खेळाडूंत ग्रूप करून राहण्याची प्रवृत्ती होती.

वॉरेलच्या नेतृत्वाखाली आम्ही हे सगळे भेदभाव विसरलो. आम्ही सगळे एकाच मोठ्या कुटुंबातले असल्यासारखे वागू लागलो इतर सर्व काही विसरलं तरी केवळ एवढ्यासाठी आम्हांला या थोर खेळाडूची सदैव आठवण राहील." त्याबरोबरच आपल्या 'पेस लाईक फायर' या पुस्तकात तो आपल्याला वॉरेलबद्दलच्या काही गमतीच्या हकीकती सांगतो. वॉरेल झोपाळू म्हणून प्रसिद्ध होता. कोणत्याही परि-स्थितीत, कितीही खळबळजनक खेळ मैदानावर चालू असला तरी त्याला वाटल्यास तो झोपी जाऊ शकत असे. त्याच्या या सवयीमुळे एकदा मात्र फारच गोंधळ उडाला. जमेका विरुद्ध कॅव्हेलिअर्स एलेवन् या सामन्यात तो जमेकाचा कर्णधार होता. शेव-टचे दिवशी उपाहाराचे वेळी वॉरेलने आपला डाव घोषित केला असता तरच साम-न्यात काही औत्सुक्य शिल्लक राहिले असते. चहापानापर्यंतही डाव घोषित न केल्याने सगळे विचारात पडले. थोड्या वेळाने वॉरेल शांतपणे कॅव्हेलिअर्सच्या खोलीत गेला आणि त्याने त्यांची अगदी मनापासून क्षमा मागितली. कारण झोप लागल्यामुळे तो डाव घोषित करू शकला नाही. डोकी शांत ठेवा हा वॉरेलचा आम्हांला नेहमी सल्ला असे आणि ब्रिस्बेन टेस्टच्या शेवटीशेवटी त्याने त्याचाच सतत पुनरुच्चार केला. आणि मॅच संपल्यावर मीच सगळ्यांत अधिक नर्व्हस झालो होतो, असं कबूल करून त्यानं आम्हांला चांगलंच हसवलं.

## प्रथम दर्जाचा फलंदाज

वॉरेलला त्याच्या आयुष्याच्या उत्तरार्धात जी अमाप प्रसिद्धी आणि यश मिळालं, ते क्रिकेटला पुनरुज्जीवन प्राप्त करून देणारा एक थोर कर्णधार म्हणून! पण प्रथम लोकांच्या डोळ्यांत तो भरला तो एक प्रथम दर्जाचा फलंदाज या नात्यानं. वॉरेलनं आपल्या फलंदाजीनं अनेक देशांतल्या प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केलं. शैलीमध्ये त्याच्याशी तुलना होऊ शकतील असे फलंदाज हाताच्या बोटांवर मोजण्याइतकेच असतील! तो खेळत असताना क्रिकेटचं शिक्षण देणाऱ्या पुस्तकातील चित्रेच सजीव होऊन फलंदाजी करत आहेत, असा भास होण्याइतकी त्याची फलंदाजी शास्त्रशुद्ध होती. बेरी सर्वाधिकारी त्याच्या फलंदाजीबद्दल म्हणतात, "वॉरेल हा युद्धकाळा-नंतरच्या फलंदाजांत जवळजवळ सर्वश्रेष्ठ आणि सगळ्यांत आल्हाददायक फलंदाज होता हे बहुतेक जाणकार मान्य करतात. नैसर्गिक कला आणि शास्त्रशुद्धता यांचं सुरेख मिश्रण म्हणजे त्याची फलंदाजी. कोणत्याही तऱ्हेच्या विकेटवर तो तितक्याच सहजतेनं खेळत असे. वॉरेलनं मनात आणलं तरी तो चुकीचा फटका मारू शकणार नाही, असं आम्ही कॉमेंटेटर्स गमतीनं म्हणत असू." वॉरेलच्या कार्याच्या गौरव म्हणून ऑस्ट्रेलियन क्रिकेट बोर्डानं ऑस्ट्रेलिया आणि वेस्ट इंडीज यांतील विजेत्या संघासाठी 'फ्रँक वॉरेल ट्रॉफी' ठेवल्याचं जाहीर केलं. त्या वेळी भाषण करताना सर डॉन ब्रॅडमन म्हणाले, "या क्षणी मला दुःख एवढ्याचंच वाटतं की वॉरेलची फलंदाजी मला आता परत पाहायला मिळणार नाही." ब्रॅडमननं असं म्हणणं याला

काही वेगळंच महत्त्व होतं. कोणत्याही फलंदाजाला अभिमानास्पद अशी ही गोष्ट होती.

वॉरेलच्या फलंदाजीतल्या यशाचं मोजमाप आकडेशास्त्राच्या मानदंडानं करणं म्हणजे ताजमहालची किंमत चौरस फुटांच्या दरानं ठरविण्याचा प्रयत्न करण्यापैकी आहे. तरीसुद्धा असं करायचंच ठरवलं तर ताजमहालची किंमत एखादे वेळी एखाद्या तीन मजली इमारतीपेक्षा कमी भरेल; पण वॉरेल मात्र आकडेशास्त्राच्या मापनातही उणा पडणार नाही. वॉरेलनं अठराव्या वर्षी बार्बेडॉसकडून खेळायला सुरुवात केली आणि पुढच्याच वर्षी त्रिनिदादविरुद्ध गोडार्डबरोबर ५०२ धावांची भागीदारी आणि स्वतःच्या ३०८ धावा केल्या. १९६१ साली ऑस्ट्रेलियाविरुद्ध तिसऱ्या कसोटी सामन्यात तीन बाद बावीस अशी धावसंख्या असताना कॅमी स्मिथबरोबर खेळून त्यानं ६७ मिनिटांत १०१ धावांची भागीदारी केली. स्वतःच्या ६५ आणि स्मिथबरोबर केलेल्या १०१ धावा यांना त्यांच्या संख्येपेक्षा फार अधिक महत्त्व होतं. हंट, कन्हाय आणि सोबर्स यांना केवळ २२ धावांत परत पाठवून डेव्हिडसन फलंदाजांचा कर्दनकाळ होऊ पाहत होता. वॉरेलने त्याचा पहिलाच चेंडू शांतपणे मिड ऑफ आणि कव्हर यांमधून बाऊंडरीकडे टोलविला. पुढचे दोन चेंडू अंगावर घेतले आणि चौथा चेंडू गुडघा वाकवून काडकन ऑफ साईडच्या बाऊंडरीला थडकवला. केवळ दहा मिनिटांच्या अवधीत त्यानं डेव्हिडसनला एक दुय्यम दर्जाचा गोलंदाज बनविला. १९५९ साली सोबर्सबरोबर इंग्लंडविरुद्ध त्याने ब्रिजटाऊनच्या कसोटी सामन्यात ३९९ धावांची भागीदारी आणि स्वतःच्या नाबाद १९७ धावा काही दिवस खेळून केल्या. पण मला वाटतं ही इनिंग विसरून जावी अशी स्वतः वॉरेलचीच इच्छा असली पाहिजे, इतकी ती संथपणे खेळली गेली होती. तो एकूण ५१ टेस्टस्‌मध्ये ८७ डाव खेळला आणि त्यात ४९·४८ या सरासरीनं त्यानं ३८६० धावा केल्या. केवळ या निर्जीव आकड्यांवरही तो एक चांगला फलंदाज म्हणून गणला जाईल.

स्वतःच्या दृष्टीनं वॉरेल अगदी परिपूर्ण आयुष्य जगला होता. लोकमान्यतेवर १९६४ साली राजमान्यतेचं शिक्कामोर्तब झालं होतं. इंग्लंडच्या राणीनं त्याला 'सर' हा किताब देऊन फ्रँक वॉरेलचा बहुमान केला होता. इंग्लंडात स्वतःच्या नेतृत्वाखाली वेस्ट इंडियन संघाला इंग्लंडवर विजय मिळवून देण्याची महत्त्वाकांक्षा त्यानं साध्य केली होती. वेस्ट इंडीज्‌ला जगज्जेतेपदाच्या उंबऱ्यापाशी नेऊन पोचविलं होतं. असं असलं तरी वेस्ट इंडीजसाठी आणि क्रिकेटसाठी अजून कितीतरी करायचं राहून गेलं होतं. पण !

**सुधीर आपटे**

●

# नाझी प्रचारपटांची

## सूत्रधार

# लेनी राईफेन्स्टाल

हिटलरच्या राजवटीने अनेक शिकण्यासारख्या गोष्टी जगाला पुरविल्या. नाझी प्रचारपटांनी प्रचारतंत्रात, तसेच चित्रपटसृष्टीत खळबळजनक कामगिरी केली. शत्रूला नामोहरम करणे व त्यासाठी प्रखर प्रचार करणे हे अत्यंत आवश्यक असल्याचे प्रचारमंत्री डॉ. गोबेल्स याने अचूक हेरले आणि प्रचारपटांद्वारे हिटलर-प्रशंसेचे पिलू लोकांत सोडले. आश्चर्याची गोष्ट म्हणजे हिटलरची प्रचार-स्वप्ने सिनेमाद्वारा सत्य-सृष्टीत उतरविण्याचे साहसी कार्य केले ते एका स्त्रीने ! जर्मन प्रचारपटांची ही स्त्री-सूत्रधार दुसरी-तिसरी कोणी नसून लेनी राईफेन्स्टाल ही होती ! सुरुवातीच्या काळात नर्तिका म्हणून प्रशंसा मिळविलेली ही बाई पुढे चित्रतारका झाली. त्यानंतर मग तिने चित्रपट–दिग्दर्शिका म्हणून नाव कमाविले आणि हिटलरची मेहेरनजर तिच्यावर पडताच, हिटलरची मैत्रिण ह्या नात्याने तिने दोन अत्यंत उत्कृष्ट प्रचार-पट निर्माण केले. ह्या प्रचारपटांना सिनेजगात निदान आजतरी तोड नाही.

२२ ऑगस्ट १९०७ रोजी बर्लिनमध्ये तिचा जन्म झाला. लहानपणापासून तिच्या सौंदर्यामुळे ती लोकांना आवडू लागली. नृत्याचेही तिला चांगले अंग होते. वयाच्या सोळाव्या वर्षीच तिने उत्तम बॅले डान्सर म्हणून प्रसिद्धी मिळविली. पण १९२४ सालातील एका प्रसंगाने, तिच्या जीवनात क्रांती घडवून आणली. एके दिवशी बर्लिनमध्ये तिच्या नाचाचा प्रोग्रॅम पाहण्यास सुप्रसिद्ध दिग्दर्शक डॉ. अर्नोल्ड फॅन्स हा उपस्थित होता. तिचे हावभाव, नृत्यातील चापल्य, सौंदर्य याने प्रभावित होऊन तिला आपल्या चित्रपटात काम देण्याचे त्याने निश्चित केले. येथूनच लेनीच्या चित्रपट-जीवनास सुरुवात झाली.

अर्नोल्ड फॅन्स हा पर्वतराजींच्या पार्श्वभूमीवरील चित्रपट करणाऱ्यांपैकी प्रमुख म्हणून समजला जाई. उंच उंच पर्वतशिखरांवर आपल्या युनिटसह चढून निसर्ग-सौंदर्य टिपणारा म्हणून त्याची ख्याती होती. आपल्या 'The Holy Mountain' ह्या चित्रपटासाठी त्याला एका सुंदर स्त्रीची जरूरी होती; भूमिका लेनीला देण्याचे त्याने ठरविले. मात्र त्यासाठी तिला डोंगरावर चढण्याचे शिक्षण देण्याची अवश्यकता होती. परंतु रंगमंचकावर नाचणाऱ्या ह्या नर्तकीने गिर्यारोहणातही आघाडी मारली. अगदी थोड्या अवधीत तिने ती विद्या उत्कृष्टपणे आत्मसात केली. त्यातील तिचे प्रावीण्य पाहून जर्मनीतील 'Who's who' नावाच्या डिरेक्टरीत लवकरच तिचा उल्लेख 'Mountain Climbing & Sking Girl' म्हणून केला जाऊ लागला.

फॅन्स याच्या फिल्म्समध्ये काम करता करता तिने अभिनयकला पण आत्मसात केली. आता ती नुसतीच डान्सर, गिर्यारोहण करणारी स्त्री न राहता उत्कृष्ट अभिनेत्रीत तिचे रूपांतर होऊ लागले होते. त्यानंतर तिने 'The Rebel'; 'Fate of the House of Hapsburg' आदी गाजलेल्या चित्रपटांत भूमिका केल्या. ह्याच वेळी सुप्रसिद्ध जर्मन दिग्दर्शक पाब्स्ट (PABST) व फॅन्स यांनी काढलेल्या संयुक्त चित्रपटांत लेनीला पाब्स्ट यांचेकडून अभिनयाचे अधिक धडे घेऊन अभिनय-कौशल्यात खूपच प्रगती करता आली. मात्र त्याबरोबरच तिने दिग्दर्शनाचे पण धडे घेतले. ह्या काळात तिने अत्यंत परिश्रमपूर्वक काम केले, तिच्या ह्या अविरत श्रमांबद्दल पाब्स्ट याला फार आश्चर्य वाटावयाचे. तिच्या कामाचा झपाटा पाहून तो म्हणावयाचा, "It's terible, what a woman!"

'The Blue Light' मधील Junta च्या भूमिकेने लेनीला प्रसिद्धीच्या शिखरावर नेऊन बसविले. ह्या चित्रपटाच्या दिग्दर्शनातदेखील लेनीचा प्रमुख हात होता व त्यातून तिचे दिग्दर्शन-कौशल्य प्रकर्षाने प्रकट होत होते. चित्रपट फारच गाजला-'A Film of Extraordinary Beauty' असा या चित्रपटाचा सिने-समीक्षकांनी गौरव केला.

## PERFECT GERMAN WOMAN

१९३२ साली ही फिल्म जर्मनीत नियमितपणे दाखविली गेली. पाहुण्यासाठी खास आयोजित केलेल्या 'शो'ला हिटलर जातीने हजर होता; आणि त्याने चित्रपटाची दिग्दर्शिका व अभिनेत्री लेनीचे मन:पूर्वक कौतुक केले होते. तथापि लेनी व हिटलर यांची प्रत्यक्षात ओळख घडवून आणली ती प्रचारमंत्री डॉ. गोबेल्स याने! हिटलरच्या उग्र व तापट स्वभावाला थोडेसे वळण लागावे व तो शांत व्हावा यासाठी त्याला मैत्रीण शोधण्याच्या प्रयत्नात डॉ. गोबेल्स होताच. लेनीचा देखणेपणा व हुशारी याने हिटलर नक्कीच मोहून जाईल ह्या खात्रीने त्याने दोघांची ओळख करून दिली होती.

आणि प्रत्यक्षात झाले गोबेल्सच्या मनाप्रमाणेच ! हळूहळू लेनीच्या भेटीसाठी स्टुडिओत हिटलरचे चकरा मारणे सुरू झाले. बरेच वेळा तो लेनी बरोबर स्टुडिओतच जेवण पण घेई. हळूहळू त्याची मैत्री पण होत चालली होती. लेनी आता हिटलरवर प्रेमाने थोड्याफार प्रमाणात अधिकार पण गाजवू लागली होती. लेनीचे दिग्दर्शन-कौशल्य पाहून हिटलरने प्रचारपट-निर्मितीचे काम लेनीवर सोपविले; आणि त्यासाठी त्याने तिला अनेक सवलती दिल्या. कोणत्याही वेळी हिटलरशी प्रचारपटांबाबत चर्चा करण्याची परवानगी फक्त लेनीलाच होती.

साहजिकपणेच त्यांच्या या मैत्रीबद्दल अनेक तर्कवितर्क मग जर्मनीत फैलावू लागले. लेनी-फ्यूररसंबंधी लोकांत चर्चा चालू होती. मात्र उघडपणे कोणीच बोलत नव्हते, हिटलरचे सर्वांनाच भय होते. याबाबत लेनी म्हणते, " Infact, there was really nothing in it. Hitler respected me as an Artist, nothing more... पण तिच्याबाबत बोलताना हिटलर मात्र नेहमी तिचा उल्लेख ' Perfect German woman ' असाच करी, त्यांच्या ह्या मैत्रीसंबंधी कोणी काहीही म्हणो, पण हिटलरला लेनीबद्दल बौद्धिक म्हणा अगर इतर म्हणा, पण अत्यंत प्रेम होते. त्या काळातील एक सुप्रसिद्ध सिनेतज्ज्ञ म्हणतो, " It is clear, however, from all the available evidence, that Platonically or otherwise the dictator very much liked to surround himself with woman like Leni, who was both attractive and intelligent. " तथापि डॉ. गोबेल्सबद्दल मात्र, त्याने जरी लेनीची हिटलरशी ओळख केली असली तरी; लेनीला नेहमीच नफरत वाटावयाची तिच्याच शब्दांत सांगावयाचे तर Goebbels was a big enemy of mine ' असे ती म्हणावयाची.

फ्यूररने प्रचारपटाची कामगिरी लेनीवर सोपविताच तिन हिटलरचे प्रचाराबाबतचे स्वप्न पूर्ण करण्याचा चंगच बांधला. नाझींकरिता तिने केलेली पहिली फिल्म म्हणजे ' Victory of Faith ' ही होय. हिटलर सत्तेवर आल्यानंतर भरलेल्या नाझी पार्टीच्या अधिवेशनाबाबतचा हा प्रचारपट होता. ह्या प्रचारपटांतून तिने आपल्या दिग्दर्शनाची व संकलनाची चुणूक दाखविली. त्यानंतर १९३५ मध्ये तिने ' Day of Freedom ' हा प्रचारपट निर्माण केला. ह्यात पण तिने प्रचार तंत्राचा उत्कृष्ट उपयोग केला.

परंतु यानंतर मात्र तिने केलेल्या ' Triumph of the will ' ह्या प्रचारपटाला मात्र इतिहासात तोड नाही. प्रचाराच्या बाबतीत हा लघुपट Masterpiece समजला जातो. प्रचारपट केवढी भव्य कामगिरी करूं शकतात हे ह्या लघुपटाने सिनेतज्ज्ञाच्या दृष्टीस आणले. १९३४ साली न्यूरेन्बर्ग येथे भरलेल्या नाझी पार्टीचा मेळावा हे या प्रचारपटाचे प्रमुख उद्दिष्ट होते. ह्या मेळाव्याचे लेनीने अत्यंत भव्य

प्रमाणात चित्रीकरण केले. असंख्य कॅमेरे ह्या चित्रीकरणासाठी वापरण्यात आले होते. नाझी पक्षाची संघटित शक्ती व हिटलरचे देवपण सिद्ध करण्याबाबत ह्या प्रचारपटाने अमाप यश मिळविले.

लगेच एका वर्षात म्हणजे १९३६ साली लेनीने आणखी एक उत्कृष्ट प्रचारपट तयार केला. Olympaid हे त्याचे नाव ! वरवर जरी बर्लिनला झालेल्या ऑलिम्पिकचे हे फिल्मी चित्र असले तरी मोठ्या कौशल्याने त्याद्वारे जर्मनाचे प्राबल्य व संघटित ऐक्य ह्याचीच साऱ्या जगताला जाणीव करून देण्याचा ह्या प्रचारपटाचा उद्देश होता. ह्या प्रचारपटाचे कौतुक करताना सिनेतज्ज्ञ क्रॉकॉकर म्हणतो, " Olympaid film succeeds on three seperate planes as a factual record of a world sporting event, as a CUNNING and SKILFUL piece of NAZI PROPAGANDA & as a brilliant Example of how ARTISTIC a documentary can be. " ह्या प्रचारपटाच्या संकलनासाठी लेनीनें अतोनात कष्ट घेतले. जवळ जवळ दोन वर्षे ह्या प्रचारपटाचे संकलन चालले होते. हजारो फूट फिल्मच्या भेंडोळ्यातून पाहिजे तो Impact आणणे हे काही सोपे काम नव्हते. ह्या प्रचारपटाला अनेक देशी-विदेशी बक्षिसे मिळाली.

यानंतर युद्ध सुरू झाले. महायुद्धात जर्मनीला हार खावी लागली. हिटलरचा नाश झाला. तसे लेनीचे ग्रह फिरले. हिटलरची जिवाभावाची मैत्रीण म्हणून दोस्तांचे तिच्यावर कडक लक्ष होते. हिटलरला मदत केल्याबद्दल दोस्तांनी तिला अनेकदा कोर्टात खेचले, छळले व तिला अतोनात मानसिक ताप दिला. ह्या साऱ्या संशयातून, आरोपातून सहीसलामत सुटता, सुटता अनेक वर्षे गेली. एका उत्कृष्ट प्रचारपट दिग्दर्शिकेच्या कलेचा ह्या छळाने मुडदा पडला पुनश्च उत्कृष्ट चित्रपट निर्मिती मग ह्या दिग्दर्शिकेकडून झालीच नाही. चित्रपट निर्मितीची तिने पुन: धडपड केली; पण ह्या ना त्या कारणाने तिचे चित्रपट पूर्ण होऊ शकले नाहीत आणि जे थोडेफार निर्मिले गेले त्यावर लोकांनी बंदी घातली. का तर लेनी हिटलरच्या पक्षाची म्हणून !

परंतु असे तरी तिने निर्माण केलेले अवघे चार प्रचारपटच इतके उत्कृष्ट आहेत की, जगात त्यांना तोड नाही. आणि म्हणूनच नाझी जर्मनी-हिटलर हे शब्द आले की, माणसाच्या डोळ्यासमोर उभे राहतात ते हिटलरचे प्रचारपट आणि त्यामागील प्रेरक देवता दिग्दर्शिका लेनी राईफेन्स्टाल !

●

**रमेश के. सहस्रबुद्धे**

# राजा शिवछत्रपती

### ब. मो. पुरंदरे

## एक आकर्षक योजना

### १०० रुपयांची ठेव ६ वर्षांसाठी

- 'राजहंस प्रकाशन संस्थे'कडे ठेवल्यास सुमारे सात टक्के व्याजाच्या मोबदल्यात हा ग्रंथ प्रसिद्धीनंतर ताबडतोब विनामूल्य घरपोच मिळेल.

- 'राजहंस प्रकाशन संस्थे'कडे आपली ठेव आजच पाठवा व आपली प्रत राखून ठेवा.

- ठेवीची रक्कम 'राजहंस प्रकाशन' या नावे ड्राफ्टने वा म. ऑ.ने पाठवावी. सोबत नाव, गाव, पत्ता संपूर्ण असावा.

- चेक असल्यास तो पुणे-मुंबई बँकेवरचा असावा. इतर ठिकाणच्या बँकेवरचा चेक असल्यास ७५ पैसे वटणावळ अधिक पाठवावी.

४१९ नारायण, पुणे २

MANOOS ( Weekly ) : 40 Paise : Regd. No. M H-649




राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. **माजगावकर** यांनी संगम प्रेस प्रा. लि., ३८३ नारायण पेठ, पुणे २, येथे छापून, ४१९ नारायण पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. **माजगावकर**